शिक्षक पाहिजेत

अलिबागेत कार्यरत शैक्षणिक संस्थेला
इ. नववी, दहावीसाठी शिक्षक पाहिजेत.
विषय- मराठी, इतिहास, भूगोल, हिंदी, संस्कृत
पात्रता- पदवीधर, द्विपदवीधर
वेतन : रु. १२,०००/- पर्यंत दर महिना
अर्ज पाठवावेत-

honestefforts1012@gmail.com

कृषीवल

रायगड ॥ रविवार, दिनांक २ ऑक्टोबर २०२२

किंमत ४ ₹

जिल्हा परिषद अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर

रायगडला 'सर्वसाधारण'

। भारत रांजणकर ।
। अलिबाग ।

अनेक महिने प्रशासक असलेल्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण शनिवारी जाहीर झाले. रायगड जिल्हा परिषदेसाठी सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामुळे अनेक जणांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

दिवाळीनंतर निवणुकांचा बार?

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज संस्थांचा कारभार प्रशासकांमार्फत सुरु आहे. ओबीसी राजकीय आरक्षणाचा मुद्दा, प्रभाग रचनेचा मुद्दा, राज्यातील सत्तांतर त्यानंतरची बदललेली राजकीय स्थिती त्यामुळं राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीचा मुद्दा सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. आता जिल्हा परिषद अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. आगामी दोन ते तीन महिन्यांत राज्यात निवडणुकांचा धुरळा पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यांतील ७६७५ ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाने ग्रामविकास विभागाला मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याच्या सूचना दिल्या होत्या. आता ग्रामविकास विभागानं जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीबाबत मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रातील ३४ जिल्हा परिषदांसाठी जिल्हा परिषद अध्यक्षपदाचं आरक्षण राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलं आहे. एकीकडे राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना, दुसरीकडे ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आरक्षणाबाबत राजपत्र प्रसिद्ध करण्यात आल्यानं येत्या काही काळात निवडणूक जाहीर होणार का, याकडे ग्रामीण भागातील मतदाराचं लक्ष लागले आहे.

जिल्हानिहाय आरक्षण

ठाणे : सर्वसाधारण, पालघर : अनुसूचित जमाती, रायगड : सर्वसाधारण, रत्नागिरी :नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), सिंधुदुर्ग : सर्वसाधारण, नाशिक : सर्वसाधारण (महिला), धुळे : सर्वसाधारण (महिला), जळगाव : सर्वसाधारण, अहमदगर : अनुसूचित जमाती, नंदुरबार : अनुसूचित जमाती (महिला), पुणे : सर्वसाधारण, सोलापूर : नागरिकांचा मागास प्रवर्ग, सातारा : नागरिकांचा •› पान २ वर

नेरळ हादरले

पत्नीचा खून करून पतीची आत्महत्या

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ पोलीस ठाणे कोल्हारे ग्रामपंचायतीमधील साई मंदिर परिसरातील चाळीत तरुणाने आपल्या पत्नीचा गळा कापून हत्या केली. त्यानंतर त्या तरुणाने स्वत: गळफास घेत आपले जीवन संपविले आहे. घरातून तीन दिवस बाहेर गेली आणि •› पान २ वर

सुंदर, निरोगी व प्रकाशमान डोळ्यांसाठी

KHOJATI® SINCE 1847

K-Veda®

KHOJATI Over 175 Years SINCE 1847

डोळयांना थंडावा देऊन दृष्टी स्वच्छ व निरोगी ठेवते.

खोजाती® त्रि-फलांजन®
शहद युक्त एकमात्र स्टराईल अंजन
दृष्टि वाढ़वण्या मध्ये मददगार

३५ वर्षाच्या वयानंतर दररोज वापर करो

खोजाती® ट्विंकल®
आय ड्रोप्स
असली गुलाबच्या अर्क युक्त

१२ वर्षाच्या वयानंतर दररोज वापर करो

डोळयांचा ताण जळजळणं कमी करून आराम

खोजाती® तूप अंजन®
नो जलन,नो थकन

आयुर्वेदिक युनानी पद्दतीने गाईच्या शुद्द तुपापासून बनवलेले अंजन

खोजाती® ट्रॉय-वॉश®
हर्बल त्रिफला ऑय वॉश

डोळयांना त्वरीत थंडावा देणारा

खोजाती® नीम अंजन®
आय ड्रोप्स

नाजूक व दमलेल्या डोळयांना त्वरीत थंडावा देणारा

मोतियाबिंद आणि चश्मयाचे वाढते नंबरसाठी आयुर्वेदिक-युनानी पुस्तकात त्रिफलाचे वापर करण्याची सल्ला दिली गेली आहे.
टि.व्ही.-कॉम्प्यूटर-मोबायलने होणारा डोळयांना त्रास व प्रदुषणाने होणारी डोळयांची जळजळ ह्या पासून डोळयांचे संरक्षण.

खोजाती आयुर्वेद फार्मा

प्रमुख मेडिकल आणि आयुर्वेदिक स्टोर्समध्ये उपलब्ध

022-23462600/01/02 | www.kveda.com @kvedabykhojati @kvedacare

स्वच्छतेत 'रायगड' अव्वल राहणार

सरपंच, स्वयंसेवी संस्थांनी व्यक्त केला मनोदय

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा स्वच्छतेबाबत राज्यात अव्वल क्रमांकावर राहील, असा मनोदय ग्रामपंचायत सरपंच व स्वयंसेवी संस्थांनी व्यक्त केला. निमित्त होते 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत जिल्हा परिषदेमार्फत शुक्रवारी (ता.३०) आयोजित करण्यात आलेल्या सरपंच व स्वयंसेवी संस्थांच्या संवाद कार्यक्रमाचे. यावेळी ग्रामपंचायतींनी सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन याकडे शासकीय योजना म्हणून न पाहता लोकचळवळ म्हणून पाहिल्यास प्रत्येक ग्रामपंचायत आदर्श व स्वच्छ, सुंदर होईल असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत सरपंच व स्वयंसेवी संस्थांसाठी संवाद कार्यक्रम जिल्हा परिषद कै. ना.ना. पाटील सभगृहात संपन्न झाला. यावेळी उपस्थित सरपंच व स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींसोबत मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी संवाद साधला. घरगुती कचरा व्यवस्थापनाबरोबर सार्वजनिक स्तरावरील कचरा व्यवस्थापन अत्यंत गरजेचे आहे. गावपातळीवरील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची कामे घेण्यासाठी जागा निश्चितीबरोबरच गुणवत्तापूर्ण व दर्जेदार कामासाठी दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले. तसेच जिल्हा परिषदेच्या मार्फत घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छताविषयी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी उत्कृष्ट काम केलेल्या ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था व मंडळे यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आळा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रमोद शिंदे सर, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, आकाश गायकवाड, श्री. सकपाळ उपस्थित होते.

> **ग्रामीण विकासाचा पाया महिला बचत गट असून, सरपंच, ग्रामसेवक यांच्यासोबत स्वयंसेवी संस्था व बचत गटातील महिलांनी सक्रीय सहभाग घेतल्यास ही चळवळ यशस्वी होईल.**
> **– डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी**

उत्साह शिगेला

। अलिबाग । वार्ताहर ।

तालुक्यात ठिकठिकाणी नवरात्रोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचल्याचे चित्र दिसून येत आहे. कोरोनामुळे दोन वर्षे गरबा व अन्य कार्यक्रमांवर बंदी होती. यावर्षीपासून निर्बंधमुक्त कार्यक्रम होत असल्याने तरुणाईमध्ये उत्साह संचारला आहे.

तालुक्यातील अनेक मंडळांकडून सांस्कृतिक, धार्मिक तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शेवटचे चार दिवस रात्री बारा वाजेपर्यंत गरबा व अन्य कार्यक्रमांस मुभा देण्यात आल्याने मंडळांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

नवरात्र काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांची पथके तैनात करण्यात आली असून, चोख बंदोबस्त करण्यात येत आहे.

महत्त्वाचे

'उरणमध्ये सुसज्ज हॉस्पिटल व्हावे'

। उरण । वार्ताहर ।

तालुक्यासाठी सुसज्ज हॉस्पिटल व्हावे, या मागणीचे निवेदन उरण सामाजिक संस्थेकडून रविवार, दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांची भेट घेऊन त्यांना देण्यात येणार आहे. उरण सामाजिक संस्था २०१० पासून या मागणीसाठी उपोषण, धरणे आंदोलन, निदर्शने आदी मार्गांचा अवलंब करत आलेली आहे.

शाखा प्रमुखपदी जयेश गोरीवले

। कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील तिसे गावात शिवसेनेच्या शाखाप्रमुखपदी जयेश गोरीवले, उपशाखाप्रमुख सुशील शिगवण तसेच युवा सेना शाखा अधिकारी गणेश बिरगावले यांची नेमणूक करण्यात आली आहे.

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ ऑक्टोंबर

१) श्रीम. आशा कृष्णा शिंदे
ब्राम्हणआळ, अलिबाग
२ ऑक्टोबर १९४३

२) श्री. अलीम सत्तार शेख
श्रीबाग-२, अलिबाग
२ ऑक्टोबर १९५२

३) श्रीम. मधुरा सदन मोरे
बाजारपेठ अलिबाग
२ ऑक्टोबर १९५५

श्रीवर्धनमध्ये नवरात्रोत्सवाची धामधूम

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

दि. २६ सप्टेंबरपासून सुरु झालेल्या नवरात्रोत्सवाची धामधूम श्रीवर्धन तालुक्यातही बऱ्याच ठिकाणी दिसून येत आहे. तालुक्यातील दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत २४ ठिकाणी सार्वजनिक नवरात्रोत्सव आहे. श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकूण ३२ सार्वजनिक ठिकाणी देवींची प्रतिष्ठापना करण्यात आली असून, ३२५ खासगी ठिकाणी प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

श्रीवर्धन शहरामध्ये एकूण दहा ठिकाणी सार्वजनिक नवरात्रोत्सव साजरे केले जात आहेत. श्री सोमजाई देवी ही श्रीवर्धनची ग्रामदेवता असून, सर्वांचे श्रद्धास्थान आहे. येथे उत्सव काळात दररोज भजन व आरती मोठ्या भक्तीमय वातावरणात केली जाते. सार्वजनिक ठिकाणी प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या देवींच्या ठिकाणी विविध स्पर्धा, बक्षीस समारंभ आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले व रात्रीच्या वेळी शासकीय वेळेचे बंधन पाळून मुख्यतः गरबा नृत्य अथवा दांडिया खेळणे हा तरुणाईच्या आकर्षणाचा भाग असतो.

श्रीवर्धन शहरात व जवळपास भैरवनाथ, काळेश्री देवी, मेटकर्णी देवी, थोडे दूर मंदिर असलेली कुसुमादेवी येथेही वेगवेगळ्या पद्धतींनी नवरात्रोत्सव साजरा केला जातो तर ब्राह्मण सभा, श्रीवर्धन या संस्थेच्या भजनांचा कार्यक्रमही आयोजित केला जातो.

माथेरानचे व्हॅली क्रॉसिंग सुरू होणार?

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमध्ये पर्यटकांचे आकर्षण असलेल्या व्हॅली क्रॉसिंग आणि साहसी खेळ सुरू करण्यासाठी सर्व नियम, अटी, शर्थींना अधीन राहून परवानगी मिळावी यासाठी माथेरान शिवसेना शिंदे गट शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या पुढाकाराने येथील स्थानिक तरुणांचा हिरावलेला व्यवसाय त्यांना पुन्हा परत मिळावा याकरिता त्यांना एकत्रित घेऊन आ. महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन सादर केले.

माथेरानमध्ये पर्यटन हा एकमेव व्यवसाय असल्याने आणि येथे दुसरे कोणतेही अन्य साधन नसल्याने येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी जंगल भागात दोन डोंगर किंवा तलावाच्या दोन बाजू यांना झिप लाईन म्हणजे व्हॅली क्रॉसिंगद्वारे जोडण्याचा व्यवसाय केला जात होता. या साहसी खेळांना पर्यटकांचादेखील चांगला प्रतिसाद येथे मिळत होता. परंतु, वनविभागाच्या जमिनीवर वसलेल्या माथेरानमध्ये सुरू असलेल्या साहसी खेळांना कोणतीही परवानगी नसल्याने या जंगल भागात विविध ठिकाणी लावण्यात आलेले रोप (दोरखंड) वनविभागाने तोडून टाकले होते. त्यामुळे हा व्यवसाय बंद पडला आणि येथील अनेक कुटुंबांचे उदरनिर्वाहचे साधन बंद झाले. परंतु, आत्ता माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांना पर्यटनाबरोबर साहसी खेळ आणि व्हॅली क्रॉसिंगचा आनंददेखील घेता यावा यासाठी आणि येथील स्थानिक तरुणांचा व्यवसायदेखील पुन्हा एकदा सुरू करण्यात यावा यासाठी चंद्रकांत चौधरी यांच्या पुढाकाराने येथील स्थानिक तरुणांनी आ. महेंद्र थोरवे यांना लेखी निवेदन सादर केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी,प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं.९९६०४५६९८६, ८८०६४७९१७३, अलिबाग
- धनश्री नागडोंगरी रेवसरोड अलिबाग कपड्याच्या दुकानात १०/१२ पास/नापास कामासाठी मुली पाहीजेत. संपर्क:९९२२२१५५३६
- अलिबाग परिसरातील ऑफिस कामाकरीता मुलगा पाहिजे १० वी पास कामाची वेळ स.९ ते ६ रविवार सुट्टी पगार – ६०००-८००० मो.७९७२७९३३७०/९८२२४६१७६१
- अलिबागमधील किरणा होलसेल दुकानासाठी सेल्समन पाहिजे. ७४४७४८०००
- जागा विकणे आहे. पोयनाड नागोठणे रस्त्यालगत कुर्डूस हद्दीमध्ये १ एकर जागा विकणे आहे. ९२८४५०६०४१
- PRO IIT ACADEMY-Pen ५ वी ते १० वी क्लासेससाठी टिचर्स पाहिजेत. (Vacancy for teachers) ग्रॅज्युएट असणे अनिवार्य (Graduation req.) संपर्क : ९७६२०२६५१२, ८३९०७५०३८९
- Commercial /Professional/Function Hall/ Office premises on rental at Alibag, Raigad. Rexine materials and articles at wholesale rate. anytime contact-9226379844
- अचूक इंग्लिश सहजपणे बोलण्याची प्रत्येकाची तीव्र इच्छा निश्चितपणे विना अट पूर्ण करणारे एकमेव ज्ञानकेंद्र – ९८२२८४२८१०
- रिलायन्स जीओ बीपी पेट्रोल, डिझेल पंपावर पुरुष/महिला पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी डीएसएमची भरती करणे आहे. वयोमर्यादा २० वर्षाच्या पुढे शिक्षण १० वी पास संपर्कः- नाईक ट्रेडर्स, रिलायन्स पंप चेंढरे-अलिबाग ९११२११८१००.

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

मंदिरास सतरंज्यांची भेट

। खांब-रोहा । वार्ताहर ।

रोहा शहरातील सामाजिक कार्यकर्ते हर्षद मेहता यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील श्रीक्षेत्र तळवली तर्फे अष्टमी येथील विठ्ठल रखुमाई मंदिरास सतरंज्यांची भेट देण्यात आली.

हर्षद मेहता यांनी आपला ८० वा वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करून सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून ग्रामस्थांना ही भेट दिली आहे. तर, तळवली तर्फे अष्टमी ग्रामस्थांनी त्यांचा वाढदिवस नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून गावदेवी मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करुन केक कापला. यावेळी हर्षद मेहता आणि त्यांच्या सौ. मेहता यांचे स्वागत शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, भेटवस्तू व भगवत गीता देऊन केले. याप्रसंगी मारूती महाराज कोलाटकर, रामचंद्र बामणे, शंकर मरवडे, रामचंद्र मरवडे, मोरेश्वर मरवडे, खेळू मरवडे, लक्ष्मण मरवडे, एकनाथ मरवडे आदी उपस्थित होते.

महिला पोलिसांचा सत्कार

। महाड । प्रतिनिधी ।

माऊली महिला मंडळ कवे आळी यांनी शनिवार, दि. १ ऑक्टोबर रोजी महिला पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार करून एक वेगळा आदर्श निर्माण केला. अनेक संकटं व रात्रंदिवस काम करून सामान्य जनतेची ती आई भवानीच्या रूपाने रक्षण करते आणि अशा महिला अधिकाऱ्यांचा सत्कार हा आमच्या हस्ते झाला हेच आमच्यासाठी माणिक मोती, दुसरं काहीच नाही, अशी भावना मंडळातील महिलांनी व्यक्त केली. दरम्यान, मंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी मंडळाला लाईफ जॅकेट भेट दिले.

आरएसएसच्या मुख्यालयावर धडकरणार मोर्चा

। रसायनी । वार्ताहर ।

भारत मुक्ती मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा व इतर संघटनांच्या पाठिंब्याने राष्ट्रव्यापी संघटनाद्वारे ६ ऑक्टोबर येथे रोजी नागपूर येथील आरएसएसच्या मुख्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात पनवेल, खालापूर, उरण, पेणसह जिल्ह्यातील विविध संघटना सामील होणार असल्याची माहिती भारत मुक्ती मोर्चाचे संयोजक मनोज महाले यांनी शनिवार, दि.१ रोजी दुपारी पत्रकार परिषदेत दिली.

हा मोर्चा भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येणार असून, बहुजन समाज यावेळी रायगड जिल्ह्यातून उपस्थित राहणार असल्याचे मनोज महाले यांनी बोलताना सांगितले. मोर्चा काढण्याचे कारण सांगताना ते म्हणाले की, देशाचे संविधान बदलण्याचे षडयंत्र आरएसएस मार्फत चालू आहे. बामसेफ संघटनेचे उत्तर प्रदेश राज्य अधिवेशन रोखण्यात येऊन कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. संविधानाने देण्यात आलेल्या मूलभूत अधिकारावर हा घाला असल्याची माहिती बहुजन क्रांती मोर्चाचे संयोजक मनोज महाले यांनी बोलताना सांगितले. यावेळी राष्ट्रीय किसान मोर्चाचे मधुकर म्हात्रे, भारतीय विद्यार्थी मोर्चाचे राहूल बागडे आदी उपस्थित होते.

दिव्यांगत्वाची तपासणी करुन प्रमाणपत्र वाटप

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

रायगड जिल्हा रुग्णालय अलिबाग व उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन आणि एकता दिव्यांग कल्याणकारी संघटना श्रीवर्धन यांच्या वतीने दिव्यांग व्यक्ती तपासणी शिबीर व प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे घेण्यात आला. या शिबिरात १४६ दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. हे शिबीर हे केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियानांतर्गत घेण्यात आले. श्रीवर्धन तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत असे. त्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी एकता दिव्यांग कल्याणकारी संस्था यांच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आला आहे, असे निलेश नाक्ती यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला प्रांताधिकारी अमित शेडगे, तहसीलदार सचिन गोसावी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. गौतम देसाई, डॉ. प्रतिभा फडतरे, डॉ. शुभम शेळके, दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष निलेश नाक्ती, मुईद सरखोत, नवाब कुद्रते, भरत पवार, संतोष पारधी, उदय माळी, प्रियांका कासार, सुनील गायकर यांच्यासह युवा कुणबी संघटनेचे सागर जाधव, संतोष रटाटे, सुनील कांद्रे व असंख्य दिव्यांग बांधव उपस्थित होते.

श्रीवर्धन : कंटेनर स्टॉल्स सडले

श्रीवर्धन : समुद्र किनाऱ्यावरती अंदाजे साडेतीन किलोमीटर लांबीचा धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यात आलेला आहे. या बंधाऱ्याचे सुशोभिकरणदेखील करण्यात आले आहे. २०१९ साली तत्कालीन मुख्याधिकारी किरणकुमार मोरे व तत्कालीन नगराध्यक्ष नरेंद्र भुसाणे यांनी धूपप्रतिबंधक बंधाऱ्यावर भाडेतत्त्वावर देण्यासाठी कंटेनर स्टॉल ठेवून घेतले.

सदर स्टॉल कोणाला भाड्याने द्यायचे व भाडे किती असेल, याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असल्यामुळे हे स्टॉल ठेवल्यानंतर वर्षभर तसेच पडून होते. त्यानंतर तीन जून २०२० रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळामध्ये यातील स्टॉल जोरदार वाऱ्याच्या तडाख्यामुळे खाली पडलेले आहेत. तीन पावसाळे खाल्ल्यानंतर या स्टॉलची अवस्था आता पूर्णपणे सडलेली आहे. हे स्टॉल बसवल्यानंतर वेळीच कुणाला तरी दिले असते तर त्यांना रंगरंगोटी वगैरे करून ते व्यवस्थित राहिले असते. परंतु, जनतेचे लाखो रुपये नगरपरिषदेने कोणतीही कारवाई न केल्यामुळे वाया गेलेले आहेत.

HOME DEPARTMENT (PORTS & TRANSPORT)
MAHARASHTRA MARITIME BOARD
Indian Mercantile Chambers, 3rd Floor,
14 Ramjibhai Kamani Marg, Ballard Estate, Mumbai- 400 001
Tel : 022-22658375, Fax : 022-22614331
Website : https://mahammb.maharashtra.gov.in Email : ceommb@gmail.com

गृह विभाग (बंदरे व परिवहन)
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड
इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, ३ रा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग,
बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र. : ०२२-२२६५८३७५, फॅक्स क्र. : ०२२-२२६१४३३१

ई-निविदा सूचना (सन २०२२-२३)
Main Portal : https://mahatenders.gov.in
Department Portal : www.mahammb.maharashtra.gov.in

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई मार्फत 'Annural Maintenance Dredging at Navigation Channel of Mandwa, 2022-23' या कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.)	इसारा रक्कम (रु.)	कोऱ्या निविदेची किंमत (रु.)
१.	'Annural Maintenance Dredging at Navigation Channel of Mandwa, 2022-23'	४,९९,३०,०००/-	२,०४,८००/-	२,३६०/-

तपशीलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ३०-०९-२०२२ रोजी ११.०० वा. पासून उपलब्ध होतील. कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

सही/-
सागरी अभियंता व चिफ सर्वेअर
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई

पान १ वरून

रायगडला 'सर्वसाधारण'

मागास प्रवर्ग (महिला), सांगली : सर्वसाधारण (महिला), कोल्हापूर : सर्वसाधारण (महिला), औरंगाबाद : सर्वसाधारण, बीड : अनुसूचित जाती, नांदेड : नागरिकांचा मागास प्रवर्ग, उस्मानाबाद : सर्वसाधारण (महिला), परभणी : अनुसूचित जाती, जालना : नागरिकांचा मागास प्रवर्ग, लातूर : सर्वसाधारण (महिला), हिंगोली : सर्वसाधारण (महिला), अमरावती : सर्वसाधारण (महिला), अकोला : सर्वसाधारण (महिला), यवतमाळ : सर्वसाधारण, बुलढणा : सर्वासाधारण, वाशिम : सर्वसाधारण, नागपूर अनुसूचित जमाती, वर्धा : अनुसूचित जाती (महिला), चंद्रपूर : अनुसूचित जाती (महिला), भंडारा : अनुसूचित जमाती (महिला), गोंदिया : नागरिकांचा मागास प्रवर्ग, गडचिरोली : नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला).

नेरळ हादरले

त्याबद्दल काही सांगितले नाही या रागातून त्या तरुणाने पत्नीचा खून केला. दरम्यान, आपल्या आईवडिलांचा मृत्यू दोन्ही मुलांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला असून, या घटनेने नेरळ परिसर हादरले आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या नेरळ पूर्व भागातील कोल्हारे ग्रामपंचायतीमधील साई मंदिर येथील मोहिते चाळ येथे एक पिंटू राम हे उत्तर भारतीय जोडपे आपल्या दोन लहान मुलांसोबत भाड्याने खोली घेऊन राहात होते. शनिवार, एक ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास पूजा पिंटू राम आणि पिंटू राम यांच्यात जोरात भांडण सुरू झाले. त्यावेळी नवरा-बायको यांच्यात झालेल्या झटापटीत पिंटू राम यांच्या शरीरावर लोखंडी कात्रीचे टोक लागले, त्यावेळी पिंटू राम याने आपली पत्नी पूजाच्या गळ्यावर धारदार सुऱ्याने वार केल्याने पत्नी पूजा ही रक्ताच्या थारोळ्यात खाली पडली होती. आपली पत्नी मृत झाल्याचे पाहून पिंटू राम यानेदेखील त्याच ठिकाणी घरात गळफास घेत आपले जीवन संपविले होते.

पूजा पिंटू राम आणि पिंटू राम यांचा अंत त्या घरात त्यांची दोन्ही मुले पाहात होती.हा सर्व प्रकार घरात घडत असताना पूजा आणि पिंटूची चिमुरडी लहान मुले हे झोपेतून उठून डोळ्यासमोर आईचा खून होत असताना आणि आपले वडील मरणाला जवळ करीत असताना पाहत होती. ही घटना दहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आल्याने परिसरत एकाच खळबळ उडाली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून माहिती मिळताच घटनास्थळी नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, सहायक पोलीस निरीक्षक हनुमंत पवार, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत काळे, महिला पोलीस उपनिरीक्षक माधुरी मुळीक हे सर्व घटनास्थळी पोहोचले. तर, काही वेळातच कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे हे पोहचले आणि तपासाची सूत्रे हाती घेतली.

पिंटू राम यांचे कुटुंब नेरळमधील मोहाचीवाडीपुढील समाधान चाळ येथे राहात होते. सततच्या भांडणामुळे पूजा पिंटू राम या घरातून बाहेर पडून आपल्या मुलांसह आपल्या आईकडे नेरळ पूर्व भागातील साई मंदिर येथे राहात होत्या. परंतु, ती घरी परत न आल्याने पती पिंटू हा आपल्या सासूकडे कोल्हारे ग्रामपंचायतीमधील साई मंदिर येथे शोधण्यासाठी पोहोचला. शनिवारी सकाळी सासू आणि मेहुणी घरातून कामासाठी बाहेर पडली आणि त्यानंतर पूजा आणि पिंटू यांचे कडाक्याचे भांडण झाले. त्यात त्याची खून करण्यापर्यंत मजल केली. पिंटू राम हा आपली पत्नी पूजाच्या चारित्र्यावर सतत संशय घेत असल्याचे पूजाच्या आईकडून सांगण्यात आले. त्यामुळे या घटनेबद्दल पोलीस त्या दिशेने तपास करू लागले आहेत. या खुनाचा अधिक तपास नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर हे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.



संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

आजचे अन्नदाते
१. लायन्स क्लब ऑफ अलिबाग डायमंड, ऑक्टोबर सेवा सप्ताह निमित्त अलिबाग

मुख्य संपादक, कृषीवल

शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी
विद्यार्थ्यांनी '५ जी'चा वापर करावा

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सल्ला

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी (१) शनिवार रोजी ऑनलाईन जिओच्या ५ जी सेवेचा शुभारंभ केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवीन पनवेल येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळेत उपस्थित राहून या सेवेचा शुभारंभ केला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या शाळेतील विद्यार्थ्यांशी ऑनलाईन तर मुख्यमंत्री शिंदे यांनी मनमोकळेपणाने संवाद साधला. या सेवेचा फायदा आपल्या सुरक्षिततेसाठी, चांगले दर्जेदार

शिक्षण घेण्यासाठी करा. त्यामध्ये मनोरंजन, सिनेमा व गेम आहेतच, पण त्यातील चांगल्या बाबी घ्या, बाकी वगळा, विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी केला पाहिजे, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यासेवेतीलशिक्षणाशीनिगडीत असा प्रयोग महापालिकेच्या ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले शाळेची निवड केल्याबद्दल प्रतंपधान मोदी, अश्विनी वैष्णव आणि त्यांच्या टीमला यावेळी धन्यवाद दिले. यावेळी प्रधान सचिव भूषण गगराणी, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख व अन्य मान्यवर उपस्थित होते.

५ जीच्या माध्यमातून सगळ्या शाळाएकमेकांशीजोडल्याजातील, त्यामुळे शैक्षणिक दर्जा उंचावला जाऊ शकतो. शिक्षकांसाठीही उपयुक्त माध्यम आहे. त्यांचे ही प्रशिक्षण या माध्यमातून करण्यात येईल. वैद्यकीय क्षेत्रातदेखील यामुळे क्रांती घडेल. दृश्य माध्यमामुळे मुलांना त्याचे लवकर आकलन होऊन त्यांच्या आकलन शक्तीमध्ये प्रभावी परिवर्तन होईल. प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयातदेखील याचा उत्तम वापर होऊ शकतो. यामुळे नॉर्मल क्लासेस स्मार्ट क्लासेसमध्ये कन्व्हर्ट होऊ शकतात. त्यामुळे उत्तम दर्जाचे शिक्षण मिळू शकेल. ई. लर्निंग, डिजिटल क्लास रूम, शिक्षक प्रशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण कोणताही अडथळा न येता जलदगतीने मिळू शकते. शिक्षकांना ही त्याचा फायदा होईल. त्याचबरोबर शेतीमध्ये ही मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. बँकिंग, वैद्यकीय सेवेत ही त्याचा आपण जसा वापर करत जाऊ तसा फायदा होणार आहे. त्यामुळेच ५ जीमुळे देशात डिजिटल क्रांती होणार आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

नवरात्रोत्सव २०२२ रंगशक्ती

■ सौ. उर्वशी भोसले आणि सौ. मयूरी भोसले

अलिबाग कृषी पर्यटन संस्थेच्या पाककला स्पर्धा

अल्पना जाधव आणि स्नेहल राणे प्रथम

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

जागतिक पर्यटन दिनानिमित्त मंगळवार (२७) रोजी अलिबाग कृषी पर्यटन विकास संस्थेने आगरसुरे फाटा येथील राऊत मंगल कार्यालयात पर्यटन व्यावसायिक महिलांसाठी पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अलिबाग कृषी पर्यटन विकास संस्था विविध उपक्रम सातत्याने राबवित असते. त्याअंतर्गत जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या पाककला स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून फाऊंटन हेड रिसॉर्ट, चोंढीचे हेड शेफ जगन जना, प्रमुख पाहुणे उमाजी केळुसकर, मनोज घरत, राजाराम पडवळ, बाळकृष्ण कोळी, अमीष शिरगावकर, सुबोध राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

या पाककला स्पर्धत अल्पना आल्हाद जाधव, स्नेहल सुधाकर

राणे यांना विभागून प्रथम क्रमांक, माया शेखर पडवळ, सविता देवदत्त जोगळेकर यांना विभागून द्वितीय, तर वर्षा रवींद्र संसारे यांना तृतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मनोज घरत यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन शीतल कोळी यांनी केले. आभार देवदत्त जोगळेकर यांनी मानले.

याप्रसंगी सर्व श्री. आणि सौ. समता सुबोध राऊत, स्मितल शिरगावकर, मनाली घरत, सुमंगल कोळी, सुनीता पुरो, मनीषा पेडणेकर, सविता जोगळेकर, अल्पना जाधव, अंकिता कदम, प्रीती पाटील, शीतल कोळी, सुधाकर राणे, नितीन नाईक, सुदिन नाईक, रवींद्र संसारे, शेखर पडवळ, पर्णकुटी, आदींचा या पाककला स्पर्धेत सहभाग होता.

कॉपर आर्थिंगच्या पट्ट्यांची चोरी

। पनवेल । वार्ताहर ।

तालुक्यातील भाताण येथील अमिटी विद्यापीठ परिसरात असलेल्या सब स्टेशन मीटर रूममध्ये असलेली कॉपर आर्थिंगच्या पट्ट्यांची झाल्याची घटना घडली आहे. भाताण, अमिटी विद्यापीठ परिसरात असलेल्या सबस्टेशन मीटर रूम मध्ये दोन मीटर बॉक्सचे अंदाजे २० हजार रुपये किमतीचे एकूण बारा कोपर अर्थिंग पट्ट्या अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले आहेत. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

'बाबाची सोनपरी'ला प्रथम क्रमांक

इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये गौरव

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

डॉ. राजेंद्र चांदोरकर यांच्या 'बाबाची सोनपरी' या व्हीडीओ अल्बमला पुणे येथील नॅशनल आरकाइव्हज ऑफ इंडिया येथे पार पडलेल्या मुंबा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल मध्ये प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

मराठी फिल्म इंडस्ट्रीतील दिग्गज अभिनेते विक्रम गोखले व मोहन आगाशे यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांनी त्यांच्या सौ व कन्येसोबत स्वीकारला. सलग दुसऱ्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये हे पारितोषिक त्यांना मिळाले. यापूर्वी जुलै महिन्यात औरंगाबाद येथे एका फिल्म फेस्टिवलमध्ये याच अल्बमला पहिला नंबर मिळाला असे त्यांनी यावेळी नमुद केले.

या व्हिडीओ साँगमध्ये एक सर्व सामान्य पित्याने आपल्या कन्येला प्रतिकूल परिस्थितीत अभ्यासाबरोबरच स्पोर्टसमध्ये नैपूण्य मिळविण्यासाठी केलेली धडपड तर कन्येने पित्यासाठी केलेला त्याग व त्याचबरोबर त्यांचे एकमेकांविषयी असलले संवेदनशील नाते सादर केले आहे.

डॉ. राज प्रॉडक्शन्सच्या बॅनरतर्फे निर्मितीस उतरलेले हे गाणे स्वतः डॉ. चांदोरकर यांनी गायले आहे. त्यात त्यांनी स्वतः व संवेदना यांनी भूमिका सादर केल्या आहेत. या गीताची गीतरचना व संगीत मनिष अनसुरकर यांचे, चित्रीकरण सुनीत गुरव, रेकॉर्डिंग वरुण भगत, संकलन विशाल गायकवाड तर दिग्दर्शन सचिन कांबळे यांचे आहे. पिता व कन्या यांचे नाते हळुवारपणे मांडणारे व प्रत्येक कन्या व पित्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू आणणारे हे गीत/व्हिडीओ साँग डॉ. राजेंद्र चांदोरकर यांच्या dr rajendra chandorkar या youtube चॅनेल वर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

कृषीवल www.krushival.in

गणेश दर्शन स्पर्धेचा बक्षीस समारंभ

कृषीवल आयोजित गणेश दर्शन स्पर्धेतील विजेत्यांचा कृषीवल कार्यालयात पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. यावेळी कृषीवलचे व्यवस्थापक रुपेश पाटील, हिरेन राठोड, अंकित भानुशाली, जाहिरात विभागाचे सचिन गुप्ता, समृद्धी म्हात्रे, वरिष्ठ उपसंपादक अतुल गुळवणी आदी उपस्थित होते.

कोस्टल रोड होणार खड्डेमुक्त

। चिरनेर । वार्ताहर ।

खोपटेपूल ते जेएनपीटीए महामार्गापर्यंत असलेल्या कोस्टल रोडवर खड्डे पडून हा रस्ता खराब झाला होता. हा रस्ता सातत्याने अवजड वाहने व प्रवासी वाहने यांनी गजबजलेला असतो. त्यावर पडलेले खड्डे लवकरात लवकर बुजवून तो पूर्ववत करण्यात यावा, यासाठी सामाजिक कार्यकर्ते गोरख ठाकूर आणि उरण पूर्व विभाग मित्र परिवार याच्याकडून मे २०२२ पासून सातत्याने पाठपुरावा चालू होता. त्याला यश आले असून, सिडकोने तातडीने खड्डे बुजवून रस्ता सुरळीत करण्यासाठी निविदा काढली आहे.

ज्येष्ठ नागरिकांची विमानातून सफर

। कर्जत । वार्ताहर ।

किरवली गावातील प्रभाकर शेळके आणि त्यांचे बंधू यांनी गावातील ४३ जेष्ठ नागरिकांना काशी यात्रेला विमानातून नेले असून ही संपूर्ण यात्रा पूर्णपणे मोफत आहे. ज्यांनी आयुष्यभर हवेतून उंचावरून जाणारे विमान बघितले आहे. अशा गावातील ज्येष्ठ नागरिकांना विमानाची सफर करून काशी यात्रेला न्यायाचे नियोजन केले. याप्रसंगी प्रभाकर शेळके, प्रा. एल. बी. पाटील, रमाकांत म्हात्रे, विवेक बडेकर, कमल विशे, प्रा. मनीषा बैकर, लक्ष्मण अभंगे, ॲड. गोपाळ शेळके यांनी उपस्थित होते.

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभा

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल तालुका माणगाव या पतसंस्थेच्या सभासदांची चोविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन आनंद यादव यांच्या अध्यक्षतेखाली संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स निजामपूर रोड माणगाव याठिकाणी गुरुवार (दि.२९) रोजी संपन्न झाली.

२४ वर्षात ही पतसंस्था आपल्या सर्वांच्याच सहकार्याने प्रगती पथावर आली आहे. दिवसेंदिवस पतसंस्थेची प्रगती होत असून या प्रगतीत सर्व संचालक मंडळाबरोबरच संस्थेचे व्यवस्थापक, कर्मचारी वर्ग, स्वल्पबचत प्रतिनिधी, ठेवीदार, भागधारक, खातेदार, हितचिंतकांचे कौतुक केले. या सभेला संचालक नरेश राजपूत, उदय म्हशेलकर, दिलीप अंबुर्ले, दिलीप जाधव, संदीप खरंगटे, जयंत बोडेरे, अली यतिनमनी, सभासद, कर्मचारी वृंद उपस्थित होते.

वाहतुकीच्या समस्या सोडवण्याची मागणी

। पनवेल । वार्ताहर ।

तळोजे औद्योगिक वसाहत क्षेत्रात होणाऱ्या अवजड वाहन पार्किंग समस्या, कारखानदारांची मनमानी, प्रमुख रस्त्यावर असलेले गतिरोधक नूतनीकरण, अवजड वाहने रस्त्यावर पार्क केल्यामुळे होणारी वाहतूक कोंडी, अपघात यामुळे होणारा नागरिकांना नाहक त्रास या संदर्भात तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. यावेळी शांताराम कुंभारकर, दत्तात्रेय फडके, परशुराम भोपी, सुनिल काठे, परशुराम गायकर, प्रमोद पाटील, मारुती म्हात्रे, दिलीप पाटील, विलास पाटील उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चिंचवली, ता. अलिबाग जि. रायगड येथिल खालील वर्णनाच्या मिळकती नमुद मालक १) श्रीमती. वसुधा वसंत जोशी, २) श्री. प्रमोद वसंत जोशी, ३) श्री. सुभाष वसंत जोशी, ४) सौ.वैशाली जितेंद्र देव,५) सौ. मृणाल महेश पेंडसे, यांच्या कडून त्यांच्या सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची खात्री मालकानी दिलेली आहे.

मिळकतीचे वर्णन

अनु.	मौजे	गट क्र.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रू.पै.)
१.	चिंचवली ता. अलिबाग	६०/२ब	१-००-०० + पो.ख. ०-२५-०० एकूण १-२५-००	२.३१
२.	चिंचवली ता. अलिबाग	६१/२/ब	१-०२-०० + पो.ख. ०-२५-०० एकुण १-२७-०० पैकी ०-६७-००	१.५२

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक ३०/०९/२०२२

ॲड. महेश श्रीवर्धन म्हात्रे
ऑफीस नं.१,शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठरोड, केळकर नाका, अलिबाग
मो.नं. - ९२२६८४७०७७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकतीचे विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे - मिरचोली, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत

जमिन मालकांचे नाव	सर्व्हे / हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.प्रति)	आकार (रु.पै.)
शुभम भगवान देशमुख अंकीता सुरेश ठमके धनश्री सुरेश ठमके नेहा सुरेश ठमके मयुरेश सुरेश ठमके संगिता सुरेश ठमके	१९/१	००-५३-०० ००-०३-०० एकूण क्षेत्र ००-५६-००	० रु.४८ पैसे

सदरहू वर नमुद केलेली जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज वगैरे प्रकाराचा हक्क वा कुळ हक्क, अन्न-वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

कर्जत
ता.२/१०/२०२२

सही/-
ॲड.सतीश अर्जुन शेळके
(B.A.L.L.B) मुंबई, हायकोर्ट
नारायण देशमुख हाऊस, दगडे अली कर्जत (पुर्व)
कर्जत-रायगड (मो.नं.९८८११३२२४८)

जाहीर नोटीस

दि.०१/१०/२०२२

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेली विद्यमान मालक गुरूनाथ चांगु धुमाळ यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार आमच्या अशिलांच्या सोबत झालेला आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणेः-

मिळकतीचे वर्णन

अ.क्र	मौजे	सर्व्हे नं	क्षेत्र(हे.आर.)	आकार (रू.पै.)
१	आंबेपूर ता.अलिबाग	१२६/४	०-३८-४० पो.ख.०-०२-३० एकूण ०-४०-७०	६.५०

या मिळकतीपैकी ०-१६-०० हे.आर.इतक्या क्षेत्राची मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
ॲड.आशिष नरेंद्र म्हात्रे
मु.पेझारी पो.पोयनाड
ता.अलिबाग जि.रायगड
मोबा नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणेः-

मौजे-नसरापुर, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
श्री.वामन दामु हजारे	६१	१/ड/२/ब	०.२०.००	०.१०

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकाची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदृंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि.०२/१०/२०२२

खरेदीदारातर्फे वकील
ॲड.लक्ष्मण धर्मराज जाधव
पत्ताः मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत जि.रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

पाली येथील मे.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात, पाली-सुधागड

प्रो.फ्री.जमा — वकीलः सौ.प्रतिमा भिलारे

किरकोळ चौकशी अर्ज क्र.५५/२०२२
ने.ता.७/११/२०२२

श्री.सुंदर त्रिंबक भिलारे — अर्जदार

विरूध्द

ग्रुपग्रामपंचायत आतोणे,
कार्यालय-आतोणे, पो.आतोणे — सामनेवाला
ता.सुधागड, जि.रायगड

जाहीर नोटीस

वरील अर्जदार यांनी,

आई, मयत कै.सरस्वती त्रिंबक भिलारे या, मु.कळंबोशी, पो.आतोणे, ता.सुधागड, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झाल्या असून त्यांचा मृत्यू दि.१४/०६/२००१ रोजी झालेला आहे. त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुपग्रामपंचायत आतोणे, यांच्या कार्यालयात करण्यात आलेली नाही, त्याकारणाने अर्जदार यांनी दि.२७/०९/२०२२ में न्यायालय, पाली येथे अर्ज दाखल केलेला आहे.

ज्याअर्थी, अर्जदार यांची आई मयत कै.सरस्वती त्रिंबक भिलारे यांच्या मृत्यूची नोंद व्हावी म्हणून मे.न्यायालय, पाली येथे अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, सदर मृत्यूबाबत कोणत्याही व्यक्तीचे, कोणत्याही प्रकारची काही हरकत अगर तक्रार वगैरे असल्यास, त्याने ही लेखी नोटीस जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होऊन दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे पुरावा घेवून त्याचा म्हणणे शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मृत्यूची नोंद व्हावी म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज दि.२९ माहे ०९ २०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.

सही/-
क.लिपिक
दि.न्या.क.स्तर पाली

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहायक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, क.स्तर पाली

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मौजे. रामराज, ता.अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिला व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं	क्षेत्र(हे.आर.)	आकार(रू.पै.)
मु.रामराज, ता.अलिबाग	१३२/२	०-२१-००	२.८६
	१३२/१	०-२९-००	४.८७
	१३०/३	०-८१-००	१.३१
	३४/१	१-१३-७०	७.०६

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचाही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,
अलिबाग,
दिनांक : ०२/१०/२०२२

सही/-
ॲड.योगेश द.घाडगे
जिल्हा न्यायालय, रायगड
बी.ए.एलएल.बी
पत्ता-मु.पो.कुरूळ, ता.अलिबाग जि.रायगड
मो.नं.९६३७२७१८१७

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.सचिन श्रृंगारपुरे रा.माऊली आशिष, झिराळआळी-पेण, ता.पेण, जि.रायगड यांनी पेण हद्दीतील गांव-विराणी, ता.पेण येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री.प्रशांत राम तिरोडकर, श्री.माया राम तिरोडकर, सुहास राम तिरोडकर, चंद्रशेखर राम तिरोडकर यांच्याकडून कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

अ क्र.	गाव	सर्व्हे नं./ हिस्सा नं	क्षेत्र (हे.आर)	आकार (रू.पै.)	भुधारणा पद्धत
१	विराणी-पेण	१८/अ/९	०-४२-००	०.२१	वर्ग १
२	विराणी-पेण	१८/अ/१०	०-४०-५०	०.२०	वर्ग १

वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकीहक्क, ताबेकब्जा अथवा इतर कोणताही हक्क, हितसंबंध नाही तसेच सदर मिळकतींवर कोणाचाही कर्ज, तारण, गहाण,दान, बक्षीस, फरोक्त, मृत्युपत्रांकीत दान, जप्ती, साठेकरार, वारसाहक्क, दावा, मालकीदान, बोजा, जाणे येण्याचा मार्ग, पोटगी, वहिवाट वगैरे नाही. मात्र सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या कायदेशीर कागदपत्रांच्या पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७(सात) दिवसांचे आत आमचे अशिल यांचे वरील नमुद पत्त्यावर अथवा खाली सही करणार यांच्या पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर मुदतीमध्ये कोणाचीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास वरील वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बिनजोखमीच्या आहेत असे समजून आमचे अशिल या मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पेण
दिनांक : ०२/१०/२०२२

सही/-
ॲड.क्रांती यशवंत ठुले
रा.बी/३०३, ओम प्रथमेश रेसिडेंन्सी,
बोरगाव रोड, दातार आळी-पेण,
ता.पेण, जि.रायगड
मो.नं.९०२८६३४५८१/९२८४४५७०३३

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल हे मौजे नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेली बागायत मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.सुरेंद्र आत्माराम पाटील, सुप्रिया सुरेंद्र पाटील व श्री मयुर सुरेंद्र पाटील यांच्याकडून विकत घेण्यास इच्छुक आहेत. मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे नागाव, ता.अलिबाग जि.रायगड येथील-

गट क्रमांक/ हिस्सा क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी	आकार रू.पैसे.
२१४/२	०-१७-१० पो.ख.०-०२-९० एकूण ०-२०-००	७-८३

येणेप्रमाणे वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, ताबा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार ठरवून खरेदीखत पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०२/१०/२०२२

ॲड.निलेश अशोक म्हात्रे
गुरूकृपा, महर्षी कर्वे रोड
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे-वायशेत, ता.अलिबाग, भुमापन क्रमांक व उपविभाग ११/२/ब क्षेत्र ०-१४.०० हे.आर.+पो.ख. ०-०४.०० हे.आर. एकूण क्षेत्र ०-१८.०० हे.आर. आकार ४.५६ पैसे हे मिळकत श्री.काशिनाथ नारायण थळकर, रा.पिंपळभाट, ता.अलिबाग यांच्या मालकी व ताबे कब्जाची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ वरून तसे दिसते. सदरहू मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायम फरोक्त घेण्याची ठरविलेली आहे. तरी सदरहू मिळकतींत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, साठेकरार, मृत्युपत्र, अखत्यारपत्र वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न, वस्त्र, बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून फरोक्तखत रजिस्ट्रर केले जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

अलिबाग
दिनांक : ०२/१०/२०२२

सही/-
ॲड.विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा,पो.झिराड,
ता.अलिबाग जि.रायगड
मो.नं.९८२२१८६७४०.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीमधील क्षेत्र सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.राजेंद्र सुधाकर म्हात्रे वगैरे यांचेकडून विकत घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे भादाणे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील

गट नंबर	क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी	आकार रू.पै.
१२२	०-९७-६०	२१.३१

सदर मिळकतीपैकी श्री.राजेंद्र सुधाकर म्हात्रे वगैरे यांचे सामाईक मालकीचे ०-८१-६० हे.आर.क्षेत्रापैकी ०-२०-०० हे.आर. इतके क्षेत्र

वर नमूद मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेकरीता व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि.०२.१०.२०२२

ॲड.निलेश अशोक म्हात्रे
गुरूकृपा, महर्षी कर्वे रोड, अलिबाग
ता.अलिबाग जि.रायगड

Bandhan Bank

रीजनल ऑफिसः नेताजी मार्ग, मिठाकली सिक्स रस्त्यांजवळ, एलिसब्रीज, अहमदाबाद-06. फोनः +91-79-26421671-75

प्रतीकात्मक ताबा सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की सेक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 या अधिनियमांतर्गत आणि कलम 13(12), सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचून त्याअन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन, प्राधिकृत अधिकाऱ्याने खालिल खात्यासमोर नमूद दिनांकेला मागणी नोटिस कर्जदार निर्गमित केली असून त्यात कथित सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत ती रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती. कर्जदारांनी कर्जाची परतफेड न केल्यामुळे याद्वारे कर्जदारांना, आणि सर्वसाधारण जनतेला नोटिस देण्यात येते की खाली सही करणाऱ्याने येथे खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा, कथित ॲक्टचा सेक्शन 13(4) हा, कथित नियम 8 सह वाचला असता त्याखाली त्याला दिलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली दिलेल्या खात्यासमोर निर्देशित केलेल्या तारखेला घेतलेला आहे. याद्वारे कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला मालमत्तेसंबंधात कोणताही व्यवहार न करण्याचा सावधगिरीचा इशारा देण्यात येत आहे आणि मालमत्तेबाबत करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा रक्कम, व्याज, खर्च आणि शुल्कसाठी बंधन बँक लिमिटेडच्या प्रभारांच्या आधीन असेल. प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संबंधात, अधिनियमाच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे/मोर्टगेजरचे लक्ष वेधण्यात येत आहे.

कर्जदाराचे नाव आणि कर्ज क्रमांक	मालमत्तेचे वर्णन (सुरक्षित मालमत्ता)	मागणी नोटिसेची दिनांक	प्रतीकात्मक ताबा दिनांक	मागणी सूचनेच्या खाते दिनांकेला थकित रक्कम
श्री अरविंद सिंग श्री रोशनकुमार सिंग 412/1656	602 चौ.फूट, फायनल प्लॉट क्र. 26 जे-विंग, फ्लॅट नंबर 401, साई नगर सीएचएस लि., सिटी हॉस्पिटल जवळ, कळंबोली, ता. पनवेल, जिल्हा रायगड- 410208 येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे: उत्तरः के विंग, पूर्वः भूखंड क्रमांक 27, पश्चिमः आय विंग, दक्षिणः इमारत	31.05.2022	29.09.2022	रु.33,50,445.51
सौ. सुरेखा धर्मा भोईर श्री राणाप्रताप जे सिंग 412/1891	516 चौ. फूट, फायनल प्लॉट क्र. 905- बी/905-सी, फ्लॅट क्र. 001, सिटी स्पेस आर्केड, हनुमान मंदिराजवळ, मौजे रोडपाली, ता. पनवेल, रायगड, कळंबोली, पनवेल, जिल्हा रायगड-410218 येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे: उत्तरः ए विंग, पूर्वः खुली जागा, पश्चिमः मार्ग, दक्षिणः खुली जागा	27.05.2022	29.09.2022	रु.26,15,194.15

स्थळः रायगड
तारीखः 02/10/2022

अधिकृत अधिकारी
बंधन बँक लिमिटेड

आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरास प्रतिसाद

। नेरळ । वार्ताहर ।

तिरुपती बालाजी मंडळ भाताण, माजी आ. स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने ज्योविस आयुर्वेद दादर-मुंबई आणि नारी सामाजिक संघटना दादर-मुंबई यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरात २९७ जणांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. याप्रसंगी डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे, तानाजी पाटील, सुभाष भोईर, बबन मुकादम, अनिल पाटील, महेंद्र गोजे, अशोक भोईर, अनिल भोईर आदी उपस्थित होते.१५

डॉक्टरसह नऊ हेल्थ कन्सल्टंट अशा २४ जणांनी २९७ जणांची आरोग्य तपासणी केली.

प्रत्येक गावामध्ये कोतवाल, तलाठी हे उपस्थित राहून शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर पोहचले. त्यात तालुक्याचे प्रांत अधिकारी नैराळे, तहसिलदार शीतल रसाळ यांच्यासह मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार तालुक्यातील गावांना भेटी दिल्या.

महसूल विभागाचे अधिकारी कर्मचारी यांच्यासह सर्व ग्रामपंचायत मधील ग्रामसेवक, कृषी विभागाचे कृषी सहाय्यक, तसेच सर्व गावात पोलीस पाटील, स्वस्त धान्य दुकानदार या सर्वांनी तसेच त्या गावातील सर्व शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी मोहिमेमध्ये सहभाग घेऊन ही गावातील खरीप पीक पेऱ्याची १०० टक्के ई- पीक पाहणी करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न महसूल खात्याने केला आहे. या विशेष ई -पीक मोहिमेचा शुभारंभ तालुक्यातील डिकसळ गावात करण्यात आला.

यावेळी मंडळ अधिकारी संतोष जांभळे, विनायक साळुंके, सरिता शेळके, मंजिरी राऊत, तेजस भासे, अमर पाटील, दिपक पाटील, मदन पाटील, गुरुनाथ पाटील, बाळु पाटील, संभाजी भोईर, मारुती पाटील, विश्वास गायकर, सूर्याजी कडव, मनोहर भगत, रवींद्र राऊत, किशोर गायकवाड, वासुदेव पाटील, वसंत गायकर आदी उपस्थित होते.

'याकुब बेग'मध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल एजुकेशन सोसायटी संचालित, याकुब बेग हायस्कूल व जुनियर कॉलेज पनवेल व पी.ई.एस. इंग्लिश स्कूल व जुनियर कॉलेज पनवेल येथे प्रसिद्ध शिक्षण तज्ञ मुबारक कापडी यांचे व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कापडी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्व, वेळेचे नियोजन, भविष्यातील संधी, कोणकोणत्या क्षेत्रात करिअर केले जाऊ शकते याबाबत मार्गदर्शन केले. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमासाठी इक्बाल काझी, असिफ शकूर, अलीम पटेल, खजिनदार माझ मुल्ला, संस्थेचे सदस्य मोहम्मद हनीफ मास्तर, उसामा गुलाम हुसैन पटेल, अब्दुल कुद्दूस डोलारे, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभारप्रदर्शन माझ मुल्ला यांनी केले, तर सूत्रसंचालन अख्तरी दळवी यांनी केले.

माहिती अधिकाराबाबत मार्गदर्शन

। अलिबाग । वार्ताहर ।

जागतिक माहिती अधिकार दिनानिमित्ताने बुधवार (दि.२८) रोजी पनवेल येथील काँग्रेस भवन हॉलमध्ये जनजागृती ग्राहक मंच रायगड, पनवेल शाखा व पनवेल तालुका सेवानिवृत्त सेवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान आयोजित केले होते. सदरच्या कार्यक्रमास संस्थेचे के.एल.जाधव, सुभाष फडके, बी.पी.म्हात्रे, राजकुमार ताकमोघे, रमेश चव्हाण, शिवदास पालकर, संतोष विचारे, विजय गायकर, श्रीकांत पाटील, एस.एम.पाटील, चंद्रकांत नवगिरे, यशवंत सकपाळ उपस्थित होते.

यावेळी तालुक्यातील जवळपास शंभराहून अधिक पुरुष व महिला नागरीक उपस्थित होते. माहिती अधिकार तज्ञ अनिल गल्ही यांनी मार्गदर्शन केले. गल्ही यानी २००५ साली सुरू झालेल्या माहितीचा अधिकार माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी.पी.म्हात्रे यानी केले. सूत्रसंचालन विजय गायकर यांनी केले तर शिवदास पालकर यांनी आभार मानले.

आदई, नेवाळी गावचा पाणीप्रश्न सुटणार

। पनवेल । वार्ताहर ।

नवीन पनवेलला लागूनच असलेल्या आदई गावामध्ये नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे नागरी सुविधांवर ताण पडत आहे. त्यामुळे आदई व नेवाळी या गावांनाही पाणी टंचाईचा सामना करावा लागत होता. भविष्यात होणारी बांधकामे आणि त्यामुळे पाणी पुरवठा करताना ग्रामपंचायतीची दमछाक होणार ही गोष्ट सरपंच रमाकांत गरुडे यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून जलजीवन मिशन अंतर्गत आदई नळ पाणी पुरवठा योजनेसाठी ५.२३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे लवकरच आदई व नेवाळी गावचा पाणी प्रश्न सुटणार आहे.



सही पोषण देश रोशन कार्यक्रमाचे आयोजन

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन शहरातील संत रोहिदासनगर अंगणवाडी क्र. ४६ व कुंभार आळी अंगणवाडी क्र. ५० यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत भारत सरकारचे सही पोषण देश रोशन हे अभियान राबविण्यात आले. यावेळी महिला पालकांसाठी पाककृती आणि फळभाज्यांचे महत्व सांगण्यात आले.

चांगल्या आरोग्यासाठी संतुलित आहार महत्त्वाचा आहे. लोकांना आपल्या जीवनात पोषण व त्याचे महत्त्व जागरूक करण्यासाठी व कुपोषणाच्या समस्येला आळा घालण्यासाठी दरवर्षी १ ते ३० सप्टेंबर दरम्यान राष्ट्रीय पोषण आहार महिना अभियान साजरा करण्यात येतो. निरोगी जीवनशैली टिकवून ठेवण्यासाठी निरोगी खाण्याच्या पद्धतींचे मूल्य व योग्य पोषण याबद्दल सामान्य लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे हा याचा उद्देश आहे. यासाठी संतुलित आहार आणि सक्रिय, निरोगी जीवनशैली आवश्यक असल्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निकीता करडे, रिद्धी करंजकर तसेच अंगणवाडी मदतनीस श्रीवर्धनकर व बिर्जे यांनी मदत केली.

हृदयरोग दिनानिमित्त मार्गदर्शन

। उरण। वार्ताहर ।

हृदयरोग दिनाचे औचित्य साधून उरण तालुक्यातील प्रसिद्ध मधुमेह तज्ञ हृदयरोग तज्ञ डॉ. राहुल साठे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी हार्ट अटॅक येऊ नये, डायबेटीस होऊ नये, डायबेटीस झाल्यावर काय काळजी घ्यावी, हार्ट अटॅक आल्यावर काय करावे, डायटचे महत्व, शरीराची निगा कशी राखावी इत्यादी अनेक गोष्टींबद्दल डॉ. राहुल साठे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

मॉर्निंग कट्टा विमला तलाव उरणचे संस्थापक सुबोध दर्णे, प्रकाश दांडेकर, उल्हास मोकाशी, अनंता पाटील, दिलीप महाडिक, सुनील घरत, ॲड. मछिंद्र घरत, हरमन फर्नांडिस, अजय शिवकर, बाबुलाल, अशोक म्हात्रे, प्रदीप खैरे, लक्ष्मण सेवक, जनार्धन म्हात्रे, अशोक पालकर,चिटणीस मॅडम, राणी आदी उपस्थित होते.

नाईक-अंतुले महाविद्यालयात लसीकरण

। म्हसळा । वार्ताहर ।

वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व प्राथमिक आरोग्य केंद्र म्हसळा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कोरोना लसीकरण मोहीम राबविण्यात आली.या मोहीमेचे उद्घाटन डॉ. प्रियांका देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. सुमित चव्हाण यांनी केले, तर कार्यक्रमाची सांगता प्रा. कानिफ भोसले यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी प्रा. सुरेश दुंडे, प्रा. सलमा नझिरी, प्रा. अतिका नझिरी, प्रा. तनुजा शेख, पी.एच.सी. म्हसळाचे श्रध्दा पाटील, कविता गदरी, सुजता पाटील, नंदिनी जाधव, सागर सायगावकर, हे उपस्थित होते.

साप्ताहिक राशिभविष्य : दि. ०२ ते ०८ ऑक्टोबर २०२२

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

व्यावसायिकांना मोठा फायदा

मेष : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विकासाचे घर सक्रिय राहिल्यामुळे आपल्याला व्यावसायिक क्षेत्राची वाढ होण्यास मदत करण्यासाठी अनेक संधी मिळतील. आपली मेहनत आपल्याला व्यावसायिक क्षेत्रातील अडथळे सहजपणे पार करण्यास मदत करेल. या राशीच्या व्यावसायिकांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. बऱ्याच काळापासून रखडलेले एखादे काम सुरू करण्यासाठी ही चांगली वेळ असल्याचे देखील सिद्ध होऊ शकते. तथापि, काही ग्रहस्थितीमुळे, वाईट सवयी सोडा, किंवा त्यांच्या आहारी न जाण्याचे धोरण ठेवा. निरोगी जीवनाकडे महत्व लक्षात घ्या. आठवड्याच्या शेवटी, ग्रहस्थिती हे सूचित करते की आपल्या भूतकाळातील चुका आणि अनुभवांकडून आत्म-आकलन करण्याची आणि समजून घेण्याची आणि शिकण्याची वेळ आली आहे. **महिलांना-** या काळात आपली वृत्ती थोडीशी हट्टी आणि मतलबी होऊ शकते, ज्यामुळे वैयक्तिक आणि व्यावसायिक दोन्ही बाबींवर समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच, तुम्ही तुमच्या स्वभावाने सौम्य बनण्याचा प्रयत्न करा आणि कोणताही निर्णय घेण्यापूर्वी इतरांनी दिलेल्या सल्ल्याचे पालन करा. **शुभदिनांक-** ०२, ०५

प्रयत्नांना यश मिळेल

सिंह : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात वकील, सीए, शिक्षक, लिपिक इत्यादी व्यावसायिकांना या संक्रमण काळात चांगले परिणाम मिळण्याची शक्यता आहे. शासकीय किंवा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रयत्नात शुभ परिणाम मिळण्याची शक्यता आहे. दररोज सकाळी भगवान शिवच्या श्री शिवलीलामृताचे वाचन करा किंवा ऐका. सप्ताहाच्या सुरुवातीमध्ये आपल्या ग्रहस्थिती या गोष्टीकडे इशारा करते की, या सप्ताहात तुम्ही आपल्या आरोग्याला घेऊन अधिक सतर्क राहाल आणि आपल्या जीवनाला उत्तम बनवण्यासाठी सर्व गरजेची कामे कराल. या सप्ताहात तुम्ही योग, ध्यान किंवा काही नवीन व्यायामाच्या माध्यमाने स्वतःच्या आरोग्यावर काम करतांना दिसाल. हे न फक्त तुमची शारीरिक गोष्टीत मदत करेल तर तुम्हाला व्यावसायिक लाभ ही प्रदान करणारे सिद्ध होईल. **महिलांना-** तुमची सकारात्मकता तुमची उत्पादकता आणि दक्षतेला वाढवण्यास मदत करेल. या वेळात तुमच्या जीवनसाथी सोबत संवाद आणि समन्वय करण्यासाठी तुमच्या अतिरिक्त प्रयत्नांना यश तर मिळेलच सोबत खूप प्रशंसा आणि सहयोग मिळेल. **शुभदिनांक-** ०४,०६

नवीन भागीदारी करु शकाल

धनु : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सप्ताहाच्या सुरुवातीमध्ये ग्रहस्थितीचा परिणाम स्वरूप व्यावसाईक लोक या काळात मनाची शांतता घेण्यास अधिक इच्छुक असतांना दिसतील. तसेच सही करण्यापूर्वी त्यांनी कागदपत्र योग्य प्रकारे पहावीत. या ग्रहस्थितीमुळे तुम्हाला संतृष्ट वाटेल आणि हे सुरक्षेच्या भावनांना वाढवण्यात मदत करेल अशी आहे. सप्ताहाचा मध्य तुमच्यासाठी सर्वात चांगला असेल. या काळात जर तुम्ही नवीन परियोजना सुरु करण्याच्या विचारात आहे तर, त्यासाठी ही वेळ खूप शुभ सिद्ध होऊ शकते. कारण, या काळात तुम्ही ऊर्जा आणि उत्साहाने परिपूर्ण असाल. आपला व्यवसाय नेटवर्किंगने जोडण्यासाठी हा कालावधी उत्तम ठरू शकतो. जिथे तुम्ही अतिरिक्त धन प्राप्त करू शकता. सप्ताहाच्या शेवटी शिक्षक, पब्लिक डीलिंग, खेळ इत्यादींच्या संबंधित व्यवसायाने जोडलेल्या लोकांसाठी चांगली वेळ सिद्ध होऊ शकते. **महिलांना-** हा काळ याकडे ही इशारा करते की, आपल्या आकर्षणाच्या बळावर तुम्ही इतर लोकांना आपल्याकडे आकर्षित कराल. यामुळे तुम्ही काही नवीन भागीदारी करू शकाल. आपली कामे योग्य रीतीने पूर्ण करू शकाल. **शुभदिनांक-** ०५,०८

नातेसंबंध दृढ होण्यास मदत

वृषभ : एकूण ग्रहमान पाहता या आठवड्याच्या सुरूवातीस, ग्रहस्थिती हे सूचित करते की या कालावधीत आपल्या जीवनसाथीची संपत्ती वाढू शकते. या व्यतिरिक्त हे घर संयुक्त वित्त संबंधित देखील आहे, यावेळी आपण दोघेही प्रॉपर्टी किंवा पॉलिसीमध्ये एकत्र गुंतवणूक करण्याचा निर्णय घेऊ शकता किंवा एकाच वेळी बँकेत संयुक्त खातेदेखील उघडू शकता. असे केल्याने आपल्यातील दोघांचे संबंध आणि नाते दृढ होण्यास मदत होईल. मध्येच या राशीच्या लोकांच्या घरात एक शुभ कार्यक्रम होऊ शकतो, कारण चंद्र प्रॉपर्टी, स्टॉक मार्केट आणि ट्रेडिंगमध्ये गुंतवणूकीसाठी देखील हा एक चांगला काळ आहे. कारण भविष्यात आपल्याला त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होण्याची शक्यता आहे. हा एक चांगला काळ आहे जो भविष्यात आपल्यासाठी उपयुक्त ठरू शकतो आणि जीवनात अचूकतेने पुढे जाण्यास मदत करू शकतो. **महिलांना-** या कालावधीत काही या राशीच्या लोकांना त्यांच्या सासरच्या पक्षाकडून किंवा आपल्या जोडीदाराच्या पालकांकडून लाभ मिळू शकतात. साखर, तांदूळ, दुधासारख्या सफेद गोष्टी सोमवारी आणि शुक्रवारी दान करा. **शुभदिनांक-** ०६, ०७

सकारात्मक वार्ता मिळण्याचे संकेत

कन्या : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही या वेळात आपल्या दृष्टिकोनात अधिक सहज आणि कार्य उन्मुख व्हाल जे तुमच्या अडकलेल्या कार्याला सहजरित्या पूर्ण करण्यात तुमची मदत करेल. सप्ताहाचा मध्य प्रेमी जोडींसाठी एक चांगली वेळ सिद्ध होईल कारण, या काळात तुमच्या साथी किंवा प्रेमा सोबत तुमची समज आणि सद्भाव वाढवण्यात मदतगार सिद्ध होईल. या काळात विवाहित लोकांना कुटुंबातील विस्ताराच्या रूपात काही चांगली वार्ता ही मिळू शकते. याच्या व्यतिरित उच्च शिक्षणासाठी परदेशातील विश्व विद्यालयात प्रवेश घेणारे काही इच्छुक विद्यार्थाना या काळात काही सकारात्मक वार्ता मिळण्याचे संकेत आहे. सप्ताहाच्या शेवटी कमजोर स्थितीमध्ये तुमचे घर, कार्यालय किंवा वाहनात नूतनीकरण रूपात अचानक खर्च होऊ शकतात ज्याच्या परिणामस्वरूप, तुमच्या जीवनात अवांछित तणाव आणि खर्च वाढण्याची शक्यता आहे. **महिलांना-** या राशीच्या जातकांना आपल्या आईच्या आरोग्य विषयक समस्या पाहायला मिळतील यामुळे त्यांची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. कुटुंबातील सदस्यांमध्ये मतभेद होऊ शकतात. **शुभदिनांक-** ०६,०७

धनप्राप्ती होण्याचा कालावधी

मकर : - एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या क्षमतेनुसार यावेळी यशस्वी होण्यासाठी बऱ्याच संधी प्राप्त करू शकतात. व्यावसायिकांना सल्ला दिला जातो की, त्यांनी सोशल नेटवर्किंग साधनांचा उपयोग केला पाहिजे. ज्यामध्ये त्यांना आपल्या कार्यक्षेत्राच्या विस्तारासाठी चांगल्या संधी मिळण्याची शक्यता आहे. विद्यार्थी यावेळी आपल्या क्षमतांचे उत्तम प्रदर्शन ही करतील. यावेळी नवग्रह स्तोत्र वाचन फायद्याचे राहील. या काळात तुम्हाला मेल, इंटरनेट इत्यादी माध्यमाने काही महत्वाचे कागदपत्र प्राप्त होऊ शकतात ज्याची तुम्ही बऱ्याच काळापासून वाट पाहत होते. तुमच्या कार्यस्थळी अचानक तुम्हाला काही महत्वपूर्ण भूमिका आणि जबाबदाऱ्यांना सांभाळण्यासाठी सांगितले जाऊ शकते. ज्यामध्ये तुम्ही आनंदी ही असाल आणि थोडे तणावात ही राहू शकतात. तसेच हा कालावधी लहान यात्रांना ही दर्शवतो म्हणून, मौज मस्ती किंवा व्यापाराच्या संबंधित गोष्टींसाठी ही या काळात तुमच्या काही यात्रा होऊ शकतात. **महिलांना-** सप्ताहाच्या सुरुवातीमध्ये ग्रहस्थिती या गोष्टीकडे इशारा करते की, तुम्ही या काळात आपल्या भाऊ बहीण, मित्र आणि नातेवाईकांसोबत चांगल्या योगाचा आनंद घ्याल. धनप्राप्ती होण्याचा हा कालावधी आहे. **शुभदिनांक-** ०४, ०७

सुखसुविधांमध्ये वाढ होईल

मिथुन : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या विचारांना आपल्या कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे समर्थन आणि भरपूर प्रशंसा मिळेल. व्यावसायिकदृष्ट्या, या राशीच्या जातकांना व्यावसायिक क्षेत्रात काही नवीन यश मिळण्याची शक्यता आहे, जे आपल्यासाठी बरेच नवीन मार्ग उघडत असल्याचे सिद्ध होऊ शकते. या व्यतिरिक्त, या राशीच्या अविवाहित लोकांसाठी ही वेळ चांगली ठरू शकते. कारण या काळात ते त्यांच्या लव इंटरेस्ट किंवा जीवनसाथीला भेटू शकतात. तथापि, मात्र या कालावधीत आपली प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते, ज्यामुळे आपल्याला आरोग्याशी संबंधित काही समस्यांना सामोरे जावे लागेल. परिणामी त्यांच्या विलास आणि सुख-सुविधांमध्ये वाढ होईल. कारण आराम आणि विलासिताचे प्रतिनिधित्व करणारी स्थाने कार्यन्वित होणार आहेत. या व्यतिरिक्त, मालमत्ता संबंधी काही नवीन घडामोडी जसे की विक्री, खरेदी, नूतनीकरणाची शक्यताही आहे. **महिलांना-** तुळशीच्या झाडाची प्रतिदिन पूजा करा. आठवड्याच्या सुरूवातीस या राशीच्या लोकांसाठी ग्रहस्थितीमुळे,काही चांगले परिणाम मिळणार आहेत. या कालावधीत आपल्या आईबरोबरचे आपले संबंध सुधारण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक-** ०२,०८

बऱ्याच उत्तम संधी येतील

तूळ : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आताची ग्रहस्थिती तुमच्या कुंडली मध्ये खूप मजबूत धन संयोग बनवत आहे. हे याकडे इशारा करते की, या काळात तुम्हाला आपल्या संचित धन आणि बचतीच्या व्यतिरिक्त विभिन्न स्रोतांनी कमाई करण्याची नवीन संधी मिळेल. व्यावसायिक रूपात हे तुमचे विचार आणि सूचनांच्या आदान-प्रदान साठी चांगली वेळ सिद्ध होईल कारण, यावेळी तुमच्यासमोर बऱ्याच उत्तम संधी येतील. तुम्ही विवाहित असाल तर, या काळात तुम्ही आपल्या मुलांसोबत आनंदाचे क्षण घालवाल. यामुळे तुमच्या घरातील वातावरणात आनंद येण्याची शक्यता असेल. **महिलांना-** प्रेमात असलेले या राशीतील जातक या वेळात आपल्या पार्टनरला घेऊन थोडे असुरक्षित असतील. यामुळे त्यांच्या नात्यामध्ये थोडी कटुता येण्याची शक्यता आहे. भांडणाचे क्षण कुटुंबातील वातावरण खराब करतील. तथापि, या मतभेदांना समजणे आणि त्यावर मार्ग काढण्यासाठी ही वेळ उत्तम सिद्ध होऊ शकते. सकाळच्या वेळी नियमित गायत्री मंत्राचा जप करा. त्यामुळे नियमित वातावरणात बदल होईल तो बदल तुम्हाला शुभ होऊ शकेल. **शुभदिनांक-** ०३,०५

कामावर लक्ष केंद्रित करा

कुंभ : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही वेळ चांगली सिद्ध होऊ शकते कारण, त्यांना या संबंधित काही शुभ वार्ता मिळायची शक्यता आहे. सप्ताहाच्या मध्यात काळात तुम्ही थोडे घाबरलेले आणि चिंतीत दिसू शकतात कारण, तुम्ही स्वतःच्या बाबतीत विचार करण्याऐवजी कुठल्यातरी वेगळ्या गोष्टीच्या विचारात राहू शकतात की, लोक तुमच्या बाबतीत काय विचार ठेवतात आणि याचा सरळ प्रभाव तुमच्या आत्मविश्वासावर पडेल. ज्यामुळे तुम्ही कार्यस्थळी आपले उत्तम प्रदर्शन करू शकणार नाहीत. म्हणून, आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवा आणि आपल्या कामावर लक्ष केंद्रित करा आणि या गोष्टीकडे अजाबात लक्ष देऊ नका की, इतर लोक तुमच्या बाबतीत काय विचार करत आहे असे केल्यास तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि तुमचे प्रदर्शन ही उत्तम होईल. **महिलांना-** घरातील वातावरण आनंदी राहील. मनात योजलेले काही कार्य या वेळी जमून येईल जीवनसाथी आपणास सरप्राईज देऊ शकतो. मुलांना दमदाटी करू नका. त्यांची समस्या प्रेमाने सोडवण्यासाठी त्यांना मदत करा. **शुभदिनांक-** ०३,०५

आर्थिक फायदे मिळतील

कर्क : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात काहीशी स्थिती छोट्या यात्रेसाठी फायदेशीर ठरेल आणि हे त्यांच्यासाठीही चांगले ठरेल. जे आयात-निर्यातीत व्यस्त राहू इच्छितात किंवा परदेशी भूमीपासून नवीन सुरुवात करू इच्छितात. आठवड्याच्या मध्याला काही अडचणी येतील. कारण ही ग्रहस्थिती काहीशी दुर्बल मानली जाते, परिवर्तन आणि रोगाचे घर देखील मानले जाते. या कालावधीत, आपल्या योजना आणि कल्पना साकार होण्यासाठी नेहमीपेक्षा जास्त वेळ घेऊ शकतात, यामुळे आपणास आत्मविश्वास आणि सर्जनशीलता कमी वाटू शकते. व्यावसायिक ताणमुळे आपल्या वैयक्तिक जीवनावरही परिणाम होऊ शकतो. कारण आपण यावेळी अत्यंत आक्रमक आणि सहज रागावू शकता, परिणामी आपल्या साथीदाराबरोबर आणि मुलांशी संघर्ष होऊ शकतात. **महिलांना-** आठवड्याच्या शेवटच्या टप्प्यात, ग्रहस्थिती. हे सूचित करते की हा कालावधी मागील वेळेपेक्षा चांगला असेल आणि या कालावधीत आपल्याला आर्थिक फायदे देखील मिळतील. या काळात आपल्या वडिलांचीही परिस्थिती समृद्ध होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे कुटुंबात आनंदी वातावरण निर्माण होईल. **शुभदिनांक-** ०३,०७

अधिक प्रयत्न करावे लागतील

वृश्चिक : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात प्रत्येक तथ्याला सावधानीने पाहिल्यानंतर आणि दुसऱ्यांच्या माध्यमाने प्राप्त होणाऱ्या माहितीला चांगल्या प्रकारे पडताळणी करूनच मग निर्णय घ्या. कारण, यावेळी प्रबळ शक्यता आहे की, तुम्हाला मिळणारी सर्व माहिती योग्य नसेल आणि असा घाईगर्दीत घेतलेला निर्णय तुमच्यासाठी नुकसानदायक सिद्ध होऊ शकतो. सोबतच, या काळात तुमचे उद्दिष्ट्य आणि महत्वाकांक्षाला प्राप्त करण्यासाठी तुम्हाला सामान्यापेक्षा अधिक प्रयत्न करावे लागू शकतात. लाभदायक परिणाम प्राप्त करण्यासाठी या सप्ताहाच्या वेळी चांदीच्या ग्लासमध्ये पाणी प्या. त्यामुळे आपल्याला सकारात्मक बदल झालेला दिसेल. **महिलांना-** यावेळी ऑफिसला जाण्याऐवजी आपण वर्क-फ्रॉम-होम विकल्प निवडू शकतात. त्यामधून घरातील सुरक्षेच्या संबंधित हेतू पूर्ण होऊ शकतो. तरीही हा कालावधी तुमच्या वित्तसाठी व्यवस्था करणे किंवा त्याला योग्य प्रकारे प्रबंधन करण्यासाठी एक खूप चांगला काळ सिद्ध होतो आहे. तुम्ही फक्त आपले विजेचे व इतरबील जास्त येणार नाही याची काळजी घ्या. **शुभदिनांक-** ०४,०६

आर्थिक बाजू ठीक राहील

मीन : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात हा कालावधी हे दर्शविते की आपण आपल्या व्यवसायातील कार्यक्षेत्रात पुढे जायचे असल्यास, आपल्या कौशल्यांचा लाभ घेण्यासाठी आणि नवीन काहीतरी शिकण्यासाठी हा उत्कृष्ट काळ आहे. आठवड्याच्या सुरूवातीला या राशीच्या जातकांसाठी खूप चांगली राहणार आहे, काही गोष्टी आपणास सहज मिळतील आणि जे सहज मिळणार नाही ते आपण परिश्रमाने मिळवू शकाल. यावेळी आपण आपल्या कोणत्याही गुरु किंवा सल्लागारांना भेटू शकता. ज्यांच्याशी आपण कल्पनांची देवाणघेवाण करू शकता, त्यांच्याशी सल्लामसलत करू शकता आणि आपल्या जीवनात एक चांगले बदल आणू शकता. एकूणच आपल्या आठवड्यासाठी ही खूप चांगली सुरुवात होणार आहे. आपल्याला पैसा, करियर आणि पद-प्रतिष्ठाच्या यासर्व गोष्टी अचानक मिळू शकतील. **महिलांना-** दररोज सकाळी गणपतीची पूजा करा. हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. प्रकृतीची पथ्ये पाळा. विशेषतः पाणी उकळून घ्या. रात्रीचा आहार मोजकाच घ्या. **शुभदिनांक-** ०३, ०४

मोहोर

चिंतन

प्रसाद केरकर
९८६७७२११११०

जग मंदीच्या दिशेने?

रिझर्व्ह बँकेस रुपया तरता ठेवण्यासाठी ५०० कोटींहून अधिक रकमेचे डॉलर्स खर्च करावे लागले. सध्याचे वित्तीय वर्ष सुरू झाल्यापासून म्हणजे १ एप्रिलपासून आजतागायत रिझर्व्ह बँकेने ६००० कोटींहून अधिक डॉलर्स यासाठी खर्ची घातले आहेत. परिणामी आपली परकीय चलनाची गंगाजळी ५४,५६५ कोटी डॉलर्स इतकी उरली असून हा गेल्या काही महिन्यांतील निचांक ठरला आहे. हे डॉलर्स मोठ्या प्रमाणात खर्च झाले तर चालू खात्यातील तूट वाढत जाण्याचा धोका आहे व आयात आणि निर्यात यांच्या मूल्यातील तफावत म्हणजे चालू खात्यातील तूट वाढत जाणार. एकूणच आपणही एका नव्या आर्थिक संकटाच्या गर्तेत जात आहोत असे चित्र दिसते.

यंदाच्या २०२२ वर्षाला निरोप द्यायला आता जेमतेम तीन महिने शिल्लक राहिले असताना आता जग पुन्हा एकदा मंदीच्या उंबरठ्यावर उभे असल्याची चर्चा सध्या जोरात सुरु आहे. पुढील नवीन वर्षी ही मंदी तीव्र होत जाईल असेही जागतिक पातळीवर भाष्य केले जात आहे. या वृत्तामध्ये बऱ्यापैकी तथ्यही आहे कारण सध्या अमेरिकेत मंदीचे वातावरण सुरु झाले आहे. काही जणांच्या मते सर्व तांत्रिक बाबी लक्षात घेतल्या तर मंदीसाठीचे पोषक वातावरण अमेरिकेत निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. अमेरिकेतील ग्राहकांची खरेदी कमी होऊ लागली आहे, महागाई वाढू लागले आहेत तर व्याजाचे दरही झपाट्याने वाढू लागले आहेत. अमेरिकेत बेकारी दुसरीकडे वाढत चालली आहे. कोरोनाच्या महामारीतून जग पुन्हा एकदा सावरत असताना मंदी येण्यास प्रारंभ झाला आहे. आजवर जागतिक पातळीवर ज्यावेळी शतकातून एकदा महामारी येते त्यानंतर लगेचच दुसऱ्या टप्प्यात मंदी येते असा आजवरचा अनुभव आहे, त्यानुसार आता मंदी आल्यास काही आश्चर्य वाटू नये. अमेरिकेपाठोपाठ ब्रिटनमध्येही मंदीचे वातावरण सुरु झाले आहे. एकेकाळी पाचही खंडातील विविध देशात सत्ता असलेला हा देश आता मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. ब्रिटनचे आर्थिक संकट मोठे ठरल्यास व त्यावर तातडीने उपाय न योजल्यास त्याचे जागतिक पातळीवर परिणाम भोगावे लागणार आहेत. अमेरिका, ब्रिटनमध्ये आलेले हे संकट वेळीच ओळखून जगातील अनेक देशात खबरदारीचे उपाय योजण्यास सुरुवात झाली आहे. याचाच एक भाग म्हणून अमेरिका, इंग्लंड, स्वित्झर्लंड, युरोपातील अन्य देश, आशियातील फिलिपीन्स, थायलंड, मलेशिया आदी अनेक देशांनी व्याजदरांत मोठी वाढ केली आहे. अमेरिकेने वर्षांतील पाचवी आणि सलग तिसरी व्याज दरवाढ केली. यावेळी त्यांनी टक्का पाऊण टक्क्यांची व्याजदर वाढ केली आहे. अमेरिकन भांडवलशाही अर्थव्यवस्था आजही जगावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम करीत असते. अमेरिकेने आजवर केलेली व्याज दरवाढ एकंदर तीन टक्क्यांची आहे. त्यापाठोपाठ इंग्लंडनेही व्याज दरवाढ केलेली आहे. स्वित्झर्लंड या जगातील अत्यंत स्थिर आणि सुस्थितीतील अर्थव्यवस्था असलेल्या देशातही जबरदस्त व्याज दरवाढ केली आहे. जागतिक पातळीवरील सुरु झालेल्या या व्याज दरवाढीचे फटके विविध देशांतील शेअर बाजारांना बसले आहेत. त्यापुढे आपला सेन्सेक्स व निफ्टी अपवाद कसा ठरणार? आपल्या रुपयाची अवस्था तर भीषण झाली आहे, रुपयाचे मूल्य ८१ रुपयांच्या लाजिरवाण्या टप्प्यावर गडगडले आहे. हे सर्व पाहता आपल्याकडेही व्याजदर वाढणार हे ओघाने आलेच. सध्याच्या जागतिक स्थितीपासून आपणही अलिप्त राहू शकत नाही. रुपयाचे हे घसरते मूल्य थांबविण्यासाठी रिझर्व्ह बँकेने प्रयत्न सुरु केले आहेत, परंतु ते पुरेसे ठरलेले नाहीत. परंतु यातून सत्ताधाऱ्यांचे होणारे हसे व त्याजोडीला अर्थव्यवस्थेची होणारी हानी वाचवायची असेल तर रुपयाची घसरण थांबविली गेली पाहिजे. परंतु सध्याच्या रुपयाला मुक्तपणे घसरु द्यावे, असे सांगणारा एक अर्थतज्ज्ञांचा प्रवाह आहे. मात्र असे असले तरीही रिझर्व्ह बँक रुपयाला आधार देण्याचा कृत्रिम प्रयत्न करते आहे. त्यामुळे गेल्या आठवड्यात रिझर्व्ह बँकेस रुपया तरता ठेवण्यासाठी ५०० कोटींहून अधिक रकमेचे डॉलर्स खर्च करावे लागले. सध्याचे वित्तीय वर्ष सुरू झाल्यापासून म्हणजे १ एप्रिलपासून आजतागायत रिझर्व्ह बँकेने ६००० कोटींहून अधिक डॉलर्स यासाठी खर्ची घातले आहेत. परिणामी आपली परकीय चलनाची गंगाजळी ५४,५६५ कोटी डॉलर्स इतकी उरली असून हा गेल्या काही महिन्यांतील नीचांक ठरला आहे. हे डॉलर्स मोठ्या प्रमाणात खर्च झाले तर चालू खात्यातील तूट वाढत जाण्याचा धोका आहे व आयात आणि निर्यात यांच्या मूल्यातील तफावत म्हणजे चालू खात्यातील तूट वाढत जाणार. एकूणच आपणही एका नव्या आर्थिक संकटाच्या गर्तेत जात आहोत असे चित्र दिसते. कारण तूट प्रमाणाबाहेर वाढल्यास अर्थव्यवस्थेवर त्याचा मोठा ताण येतो. त्यात सध्या तरी खनिज तेलांचे दर ८० डॉलर्सवर स्थिरावले आहेत ही सर्वात समाधानाची बाब म्हटली पाहिजे. अन्यथा देशाच्या आयात-निर्यात तूट वाढण्यावर आणखी मोठा परिणाम झाला असता. कारण आजही आपण देशाच्या खनिज तेलाची मागणी ८० टक्के आयातीने पूर्ण करतो. जसे खनिज तेलाचे दर वाढतात तसा आपल्या अर्थव्यवस्थेवरील ताण वाढत जातो. यापूर्वी आपण याचे अनेक वाईट अनुभव पाहिले आहेत. भविष्यात जर खनिज तेलाचे दर वाढलेच तर मात्र आपल्याला फार मोठ्या परिणामांचा सामना करावा लागणार आहे हे निश्चित. त्यातच व्याजदर भरमसाठ वाढू नयेत यासाठी सरकारचे रिझर्व्ह बँकेवर आपला दबाव कायम राखला आहे. परंतु असा दबाव फार काळ ठेवता येणार नाही. कारण व्याजदर वाढवले की अर्थगतीस आळा बसतो. याचा राजकीय फटका सहन करावा लागत असल्याने कोणत्याही सत्ताधिशांना चढते व्याजदर नकोच असतात. अर्थमंत्री सीतारामन यांनी जागतिक पातळीवर सर्वच चलने घसरत असताना रुपया मात्र त्यातुलनेत घसरलेला नाही असे म्हणणे म्हणजे हा एक विनोदच ठरावा. जागतिक पातळीवर मंदी आल्यास त्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम आपल्यालाही भोगावा लागणार आहे हे नक्की. त्यातच आपल्याकडे वाढते व्याजदर, अर्थव्यवस्थेची धीमी झालेली गती, वाढती महागाई, बेकारी यामुळे आपल्याला मंदीची झळ जास्त सहन करावी लागेल. आपली अर्थव्यवस्था अजूनही सुस्थितीत आहे, मात्र याचे श्रेय सध्याच्या सरकारला नाही तर आजवर आपण जोपासलेल्या अर्थव्यवस्थेला आहे. मंदीचे परिणाम आपल्याला सोसावे लागतील तसेच त्याच्या जोडीने २०२४ साली म्हणजे जेमतेम दीड वर्षांनी सार्वत्रिक निवडणुका येऊ घातल्या आहेत. त्यामुळे बघायचे काय होते ते...

जी ७ आणि भारताची मुत्सद्देगिरी

जगात मुत्सद्देगिरीच्या पातळीवर भारताचा दर्जा वाढत असल्याचं अनेक तज्ज्ञांचं मत आहे. देशात पुढील वर्षी शांघाय सहकार्य परिषदे (एससीओ)ची बैठक होणार आहे. अनेक आंतरराष्ट्रीय संघटना आणि गटांचं अध्यक्षपदही भारत भूषवणार आहे. भारताला यंदा जगातल्या वीस शक्तिशाली देशांच्या जी-२० गटाचं अध्यक्षपदही मिळणार आहे. मुत्सद्देगिरीच्या प्रांतातल्या महत्त्वाच्या घडामोडी म्हणूनही याकडे पाहिलं जात आहे.

शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (एससीओ) शिखर परिषद यंदा उझबेकिस्तानच्या समरकंद शहरात पार पडली. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी या परिषदेत सहभागी झाले होते. यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भेट घेतली. 'एससीओ' भारतासाठी खूप महत्वाची असणार आहे. पुढील वर्षी भारत 'एससीओ'चं अध्यक्षपद भूषवणार आहे. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनीही 'एससीओ'मध्ये भाग घेतला. मोदी आणि जिनपिंग यांच्यात औपचारिक बैठक झाली नाही; मात्र जिनपिंग यांनी 'एससीओ'च्या अध्यक्षपदासाठी भारताला पाठिंबा दिला. याव्यतिरिक्त, शी जिनपिंग यांनी आपल्या भाषणात, 'जागतिक नेत्यांनी आंतरराष्ट्रीय व्यवस्थेनुसार विकासाला चालना देण्यासाठी तर्कशुद्ध दिशेने एकत्र काम केलं पाहिजे,' असा सूर लावला. त्याचबरोबर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनीही 'एससीओ'च्या अध्यक्षपदासाठी भारताचं अभिनंदन केलं आहे. भारत एक डिसेंबर २०२२ रोजी जगातल्या वीस सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांच्या या गटाचं नेतृत्व करेल. पुढील वर्षी तीस नोव्हेंबरपर्यंत भारताकडे हे नेतृत्व राहील. एखादा देश जी-२० चा अध्यक्ष असल्यास त्याला अतिथी देश म्हणून कोणत्याही देशाला सहभागी करण्याचा अधिकार आहे. बांगलादेश, इजिप्त, मॉरिशस, नेदरलँड, नायजेरिया, ओमान, सिंगापूर, स्पेन आणि संयुक्त अरब अमिराती या देशांना भारत जी-२० मध्ये पाहुणा देश म्हणून आमंत्रित करेल, असं भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने म्हटलं आहे. जगाच्या नकाशावर या देशांचं भौगोलिक अस्तित्व पाहिलं तर भारताने हा निर्णय अतिशय विचारपूर्वक घेतला आहे, असं लक्षात येतं.

प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

बांगलादेश हा भारताचा शेजारी देश असताना या यादीत अरबस्तान, युरोप, आफ्रिका आणि पूर्व आशियातल्या देशांचा समावेश आहे. जी-२० व्यतिरिक्त भारत संयुक्त राष्ट्रातही उपस्थिती नोंदवणार आहे. संयुक्त राष्ट्र ही एक प्रसिद्ध जागतिक संस्था आहे आणि प्रत्येक देश आपल्या सुरक्षा परिषदेची शक्ती मानतो. भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचं अध्यक्षपदही मिळणार आहे. या वर्षाच्या अखेरीस ही जबाबदारी भारताकडे देण्यात येत आहे. भारत डिसेंबर २०२२ मध्ये सुरक्षा परिषदेचं अध्यक्षपद भूषवेल. भारत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य नाही. याशिवाय जगातल्या सात बलाढ्य देशांची संघटना असलेल्या जी-सात मध्ये भारताचा समावेश करण्याबाबत चर्चा सुरू आहे; मात्र त्याला सध्या तरी फारसं यश मिळेल असं वाटत नाही; मात्र यावर्षी भारताने एक महत्त्वाची कामगिरी केली होती. यावर्षी जूनमध्ये जर्मनीत झालेल्या जी-७ शिखर परिषदेत भारताने अतिथी देशाची भूमिका बजावली होती. जर्मनीने जी-७ मध्ये भारताला पाहुणा म्हणून आमंत्रित केलं होतं. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये भारताला अध्यक्षपद मिळणं हा मोठा राजनैतिक विजय म्हणून पाहिलं जात असून या माध्यमातून भारत जगावर एक मोठा राजनैतिक ठसा उमटवेल, असं मानलं जात आहे. माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन शृंगला यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही वर्षांमध्ये जगामध्ये भारताची भूमिका अधिक महत्त्वाची बनली असून 'एससीओ', जी-२० आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचं अध्यक्षपद मिळणं हे भारताचं जागतिक राजकारणात महत्व वाढल्याचं द्योतक आहे.

भारतात दीडशे अब्ज डॉलरची विक्रमी विदेशी गुंतवणूक झाली आहे. देशातली साठ टक्के लोकसंख्या तरुण आहे. परकीय चलनाचा साठा सहाशे अब्ज डॉलरवर पोहोचला आहे आणि आर्थिक वर्षाचा अंदाजे विकास दर नऊ टक्के राहील. जग मंदीच्या चक्रातून जात असताना भारत मात्र सातत्याने प्रगती करत आहे. त्यामुळे जागतिक राजकारणात भारताचं महत्व वाढतं आहे. या वर्षाच्या अखेरीस भारताला जी-२० चं अध्यक्षपद मिळेल. जी-२० देश जगाच्या 'जीडीपी'मध्ये ऐंशी टक्के, आंतरराष्ट्रीय व्यापारात ७५ टक्के आणि लोकसंख्येच्या साठ टक्के प्रतिनिधित्व करतात. भारताला या वर्षाच्या अखेरीस जी-२०, संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचं आणि 'एससीओ'चं अध्यक्षपद मिळणार आहे. भविष्यात भारताची भूमिका काय असेल याचं हे द्योतक आहे. भारतातले पाकिस्तानचे उच्चायुक्त अब्दुल बासिल यांचाही विश्वास आहे की, भारताची राजनैतिक शक्ती सतत वाढत आहे. जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असली तरी भारताला विकसित देश घोषित करण्यासाठी अनेक दशकं लागतील. कारण भारतात करोडो लोक अजूनही गरिबीत आहेत. सप्टेंबरच्या सुरुवातीला भारत ब्रिटनला मागे टाकत सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) बाबतीत जगातली पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. मार्च २०२२ च्या अखेरीस भारताने ब्रिटनला मागे टाकल्याचं 'ब्लूमबर्ग डेटा'ने म्हटलं होतं. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आकडेवारीच्या आधारे 'ब्लूमबर्ग'ने हा निष्कर्ष काढला.

'ब्लूमबर्ग'च्या मते, या वर्षाच्या मार्च अखेरीस भारताची अर्थव्यवस्था ८५४.७ अब्ज डॉलर होती, तर ब्रिटनची अर्थव्यवस्था ८१६ अब्ज डॉलर होती. पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणं आणि जागतिक संघटनांमध्ये स्थान मिळवणं भारताची ताकद दर्शवतं, असं पाकिस्तानच्या माजी परराष्ट्र सचिवांनी म्हणणं म्हणजे भारताला वेगळं प्रशस्तिपत्रक घेण्याची गरज नाही! या सामर्थ्यामुळे भारताचा आंतरराष्ट्रीय दर्जा वाढेल. भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचं एक महिन्याचं अध्यक्षपद मिळणार असेल तर पाकिस्तानने त्यावर बारकाईने लक्ष ठेवलं पाहिजे, असं अब्दुल बासित सांगतात. यावरून पाकिस्तानने भारताची किती दहशत घेतली आहे, हे स्पष्ट होतं. पुढच्या वर्षी भारतात होणाऱ्या जी-२० देशांच्या परिषदेच्या निमित्ताने अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह जगातल्या अनेक मोठ्या देशांचे प्रमुख भारतात असतील. याशिवाय शांघाय सहकार्य परिषदेची बैठक पुढील वर्षी भारतात होणार आहे. संपूर्ण भारतात जी-२० च्या सुमारे दोनशे बैठका होणार आहेत. त्यापैकी काही बैठका जम्मू-काश्मीरमध्ये आयोजित केल्या जाऊ शकतात. तिथे कोणत्या बैठका होणार आहेत आणि कोणते देश येतील, हे अद्याप स्पष्ट व्हायचं आहे. कधी तरी भारतालाही जी-७ च्या सदस्यत्वासाठी आमंत्रित केलं जाईल आणि त्यानंतर ही संघटना जी-८ होईल.

जगातले कोणतेही प्रश्न युद्धाने सुटत नाहीत, तर सामंजस्याने, शांततापूर्ण वाटाघाटींनी सुटतात, असा सल्ला मोदी यांनी पुतीन यांना रशिया-युक्रेन युद्धाचा संदर्भ देऊन जी-७ परिषदेप्रसंगी दिला. रशियाने ताब्यात घेतलेला आपल्या देशाचा काही भाग युक्रेनने अलिकडेच परत मिळवला. रशियाला युक्रेनपुढे माघार घ्यावी लागत असल्याचं चित्र असताना रशियाने आता धरणांवर हल्ले करण्याची योजना आखली आहे. या पार्श्वभूमीवर मोदी यांनी दिलेला सल्ला पुतीन किती मानतात, हा प्रश्न आहे. शांघाय परिषदेच्या निमित्ताने जागतिक व्यासपीठावर भारताची उंची वाढल्याचं यानिमित्ताने स्पष्ट झालं आहे. युक्रेन-रशिया युद्धामुळे या 'एससीओ' शिखर परिषदेचं महत्त्व अधिक वाढलं आहे. यादरम्यान जगाच्या आणि विशेषतः पुतीन आणि जिनपिंग यांच्या भेटीकडे पाश्चिमात्य देशांच्या नजरा लागल्या होत्या. या बैठकीत पुतीन यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केलं की, रशियाचा ध्रुवीय जगाला विरोध आहे आणि ते तसं करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला विरोध करतील. ध्रुवीय जग निर्माण करण्याच्या प्रयत्नांनी अलिकडेच पूर्णपणे विकृत रूप धारण केलं असून बहुतेक जगासाठी ते पूर्णपणे अस्वीकार्य आहे, असं पुतीन म्हणाले. जिनपिंग म्हणाले की जगाला अभूतपूर्व बदलांचा सामना करावा लागत आहे आणि चीन आणि रशिया जबाबदार जागतिक शक्तीची भूमिका बजावण्यास तयार आहेत; जेणेकरून जगाला शाश्वत आणि सकारात्मक विकासाची भूमी निर्माण करता येईल.

किंबहुना, सध्याच्या जागतिक व्यवस्थेवर नजर टाकली असता हे स्पष्ट होईल की चीन, भारत आणि रशिया जगाच्या उदयोन्मुख आर्थिक शक्ती आहेत. त्याचप्रमाणे 'ब्रिक्स' आणि 'एससीओ' सारख्या संघटनांची निर्मिती हा सत्तेचा समतोल पश्चिमेकडून पूर्वेकडे झुकत असल्याचा पुरावा आहे.

महागड्या उपचारांमुळे दरवर्षी कोट्यवधी लोक गरीब होत असून त्यांना गरिबीचा सामना करावा लागत आहे. एका सरकारी अहवालातून केंद्र आणि राज्य सरकारने आरोग्यावर किती खर्च केला आणि लोकांनी स्वतःच्या खिशातून किती पैसा खर्च केला याचा तपशील पुढे आला आहे. याखेरिज मालाची सुरळीत वाहतूक आणि उद्योगांमधली स्पर्धा वाढवण्याच्या उद्देशाने आणलेली 'नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी' महत्वाची अर्थवार्ता ठरली आहे.

महागडे उपचार, गरिबांचं मरण

देशातल्या उपचारांबद्दल एक दुर्दैवी चित्र अलिकडेच समोर आलं आहे. महागड्या उपचारामुळे लोक गरिबीच्या खाईत. महागड्या उपचारांमुळे दरवर्षी कोट्यवधी लोक गरीब होत असून त्यांना गरिबीचा सामना करावा लागत आहे. लोकांना उत्तम आरोग्यासाठी उपचाराचा खर्च स्वतः उचलावा लागतो. एका सरकारी अहवालात, केंद्र आणि राज्य सरकारने आरोग्यावर किती खर्च केला आणि लोकांनी स्वतःच्या खिशातून किती पैसा खर्च केला याचा तपशील दिला आहे. सरकारच्याच अहवालानुसार, २०१८-१९ मध्ये आरोग्यावर पाच लाख ९६ हजार कोटींहून अधिक खर्च करण्यात आला. त्यापैकी दोन लाख ४२ हजार कोटी रुपये केंद्र आणि राज्य सरकारने खर्च केले. उर्वरित खर्च लोकांनी स्वतः किंवा खासगी संस्थांनी उचलला. लोक सरकारी हॉस्पिटलमध्ये जात नाहीत. खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेतात. तिथे उपचार महागडे आहेत. आजकाल बहुतांश लोक सरकारी रुग्णालयात उपचार घेणं टाळतात. त्यामुळे आपल्या खिशातून खर्च करून देशात महागड्या उपचारांमुळे गरिबी वाढत आहे. राष्ट्रीय आरोग्य खात्याच्या आकडेवारीनुसार, केंद्र सरकारने २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानावर ३० हजार ५७८ कोटी रुपये खर्च केले. संरक्षण वैद्यकीय सेवांवर १२ हजार ८५२ कोटी रुपये आणि रेल्वे आरोग्य सेवांवर चार हजार ६०६ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

महेश देशपांडे

आरोग्य विमा योजनांवर १२ हजार ६८० कोटी, आरोग्य योजनांवर चार हजार ६० कोटी आणि माजी कर्मचाऱ्यांच्या आरोग्य योजनांवर तीन हजार २२६ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. २०१३-१४ च्या आरोग्यावरील खर्चाच्या या आकडेवारीची तुलना केल्यास पाच वर्षांमध्ये आरोग्यावरील एकूण खर्चात सुमारे ३२ टक्के वाढ झाल्याचं समोर आलं आहे. त्याचबरोबर सरकारी खर्च जवळपास दुप्पट झाला आहे. २०१३-१४मध्ये, सरकारने एका वर्षात एका व्यक्तीच्या आरोग्यावर १.४२ टक्के खर्च केले. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, भूतान आपल्या 'जीडीपी'च्या २.६५ टक्के खर्च करतो तर श्रीलंका दोन टक्के खर्च करतो. नॅशनल हेल्थ अकाउंट्स, २०१४-१५ च्या अहवालात सरकारने आरोग्यावर 'जीडीपी'च्या किमान पाच टक्के खर्च करावा असं सुचवलं आहे. त्याच वेळी, आर्थिक सर्वेक्षणात 'जीडीपी'च्या अडीच ते तीन टक्के रक्कम आरोग्यावर खर्च करण्याची शिफारस करण्यात आली होती. आर्थिक सर्वेक्षणानुसार, २०२१-२२ मध्ये केंद्र आणि राज्य सरकारांनी आरोग्यावर 'जीडीपी' च्या २.१ टक्के खर्च केला.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात नमूद केलं आहे की, जगात आरोग्यावर सरासरी १८.२ टक्के खर्च होतो. आरोग्य खात्याच्या अहवालात दिसून आलं आहे की, २०१८-१९ मध्ये लोकांनी स्वतःच्या खिशातून आरोग्यावर दोन लाख ८७ हजार कोटी रुपये खर्च केले. त्यानुसार एका व्यक्तीने त्याच्या तब्येतीवर सरासरी सुमारे २००० रुपये खर्च केले. २०२०-२१ च्या आर्थिक सर्वेक्षणात म्हटलं आहे की सरकारने आरोग्यावर 'जीडीपी'च्या अडीच ते तीन टक्के खर्च केला तर वैयक्तिक आरोग्यावरील खर्च ३५ टक्क्यांपर्यंत कमी खर्च होईल. आरोग्यावर वैयक्तिक खर्च जितका कमी असेल, तितका तो चांगला मानला जातो. कारण सरकारी आरोग्य सुविधा लोकांपर्यंत पोहोचत असल्याचं ते लक्षण मानलं जातं. 'नॅशनल हेल्थ प्रोफाईल' २०२१ नुसार, एखाद्या व्यक्तीला एखाद्या गावातल्या सरकारी रुग्णालयात दाखल केल्यास त्याचा सरासरी खर्च चार हजार २९० रुपये होतो. त्याचवेळी त्यांना गावातील खासगी रुग्णालयात दाखल केल्यास २२ हजार ९९२ रुपये खर्च करावे लागत आहेत. शहरातल्या सरकारी रुग्णालयात चार हजार ८३७ रुपये तर खासगी रुग्णालयात ३८ हजार ८२२ रुपये खर्च येतो. देशातल्या एखाद्या व्यक्तीचं सरासरी वार्षिक उत्पन्न सुमारे दीड लाख असेल आणि या व्यक्तीची तब्येत बिघडून खासगी रुग्णालयात दाखल केल्यास त्याची दोन-तीन महिन्यांची कमाई केवळ बिल भरण्यातच खर्च होते. त्यामुळे त्यांना गरिबीचा सामना करावा लागत आहे. कारण तो सरकारी रुग्णालयात न जाता खासगी रुग्णालयात उपचार घेतो. सरकारीपेक्षा खासगी रुग्णालयातले उपचार महाग असल्याने लोकांचे उपचार महागले आहेत.



अर्थनगरीत आणखी एक लक्षवेधी वृत्ताची नोंद घ्यायला हवी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विज्ञान भवनात 'नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी' लाँच केली. मालाची सुरळीत वाहतूक करण्यास मदत करणं आणि उद्योगांमधली स्पर्धा वाढवणं हा या धोरणामागील उद्देश आहे. ही योजना री-इंजिनिअरिंग, डिजिटायझेशन आणि मल्टी-मोडल ट्रान्सपोर्ट यासारख्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करेल. लॉजिस्टिकची किंमत कमी करणं हादेखील या योजनेचा उद्देश आहे. निर्यातीसोबतच देशांतर्गत बाजारपेठेत भारतीय वस्तूंची स्पर्धात्मकता सुधारण्यासाठी भारतात लॉजिस्टिकची किंमत कमी करणं अत्यंत आवश्यक आहे. साथीच्या रोगानंतर विकासाला गती देण्यासाठी हे धोरण हाती घेण्यात आलं आहे. महामारीच्या संकटाच्या दोन वर्षानंतर या धोरणामुळे विकासाच्या वाढीला समर्थन मिळेल. यामुळे पुरवठा आघाडीवरील अडथळे दूर करता येतील. नव्या धोरणानुसार नियमही सोपे होणार आहेत. याशिवाय रसद खर्च कमी होण्यास आणि तेलाच्या किमती कमी होण्यास मदत होईल. या धोरणामुळे, व्यवसायांचा लॉजिस्टिक खर्च सध्याच्या १३-१४ टक्क्यांवरून एकल अंकांवर येण्याची अपेक्षा आहे.

आज भारतीय बंदरांच्या एकूण क्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे आणि जहाजांची सरासरी वळण वेळ ४४ तासांवरून २६ तासांवर आली आहे. बंदरं आणि समर्पित फ्रेट कॉरिडॉर यांना जोडणाऱ्या सागरमाला प्रकल्पाने 'लॉजिस्टिक कनेक्टिव्हिटी' आणि पायाभूत सुविधांच्या विकासाचं पद्धतशीर काम सुधारण्यास सुरुवात केली आहे. भारत मॅन्युफॅक्चरिंग हब म्हणून उदयाला येत आहे. देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी सरकारने सुरू केलेली 'प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह स्कीम' (पीएलआय) जगाने स्वीकारली आहे. लॉजिस्टिक क्षेत्राला बळकटी देण्यासाठी सरकार तंत्रज्ञानाचा वापर करत असून अधिकाऱ्यासमोर न जाता कस्टममध्ये मूल्यांकनाची यंत्रणा सुरू करण्यात येणार आहे.

याच वळणावर आणखी एका महत्वपूर्ण बातमीची नोंद घ्यायला हवी. वाणिज्य मंत्रालयाने भारतीय चलन रुपयामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार सेटलमेंटसाठी परवानगी दिली आहे. यासाठी परकीय व्यापार धोरणांतर्गत नियमांमध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. नवीन नियमांनुसार, सर्व बिलिंग, पेमेंट आणि निर्यात-आयात सेटलमेंट रुपयांमध्ये केलं जाईल. रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार हे बदल करण्यात आले आहेत. या संदर्भात 'डीजीएफटी' म्हणजेच परराष्ट्र व्यापार महासंचालनालयानेही अधिसूचना जारी केली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने जुलैमध्ये सर्व बँकांना निर्यात आणि आयात व्यवहार रुपयांमध्ये पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त व्यवस्था करण्यास सांगितलं होतं. भारतीय चलनाकडे जागतिक व्यापारी समुदायाची वाढती आवड लक्षात घेता, रिझर्व्ह बँकेने ही सुविधा सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. रिझर्व्ह बँकेच्या निर्णयानुसार, वाणिज्य मंत्रालयाअंतर्गत गठित 'फॉरेन ट्रेड डायरेक्टरेट जनरल' (डीजीएफटी) ने आता परकीय व्यापार धोरणात एक नवीन परिच्छेद जोडला आहे. या नियमानुसार आयात-निर्यात व्यवहार, बिल निर्मिती आणि भारतीय रुपयांमध्ये पेमेंट सेटलमेंट करण्यास परवानगी दिली आहे. ही अधिसूचना जारी केल्यानंतर, आता व्यावसायिक सौदे भारतीय रुपयांमध्येदेखील सेटल केले जाऊ शकतात. यासाठी भारतातल्या अधिकृत डीलर बँकांकडून विशेष 'व्होस्ट्रो' खाती उघडणं आवश्यक आहे. पुरवठादारांचे पैसे भारतीय बँक खात्यात जमा केले जातील.

वाणिज्य मंत्रालयाची मंजुरी मिळाल्यानंतर, भारतीय आयातदार या व्यवस्थेद्वारे त्यांची आयात भारतीय रुपयात भरू शकतील. ही रक्कम भागीदार देशाच्या संबंधित बँकेच्या विशेष 'व्होस्ट्रो' खात्यात जमा केली जाईल. ही रक्कम परदेशी पुरवठादाराला वस्तू किंवा सेवांच्या पुरवठ्यासाठी भरलेल्या बिलांमध्ये जमा केली जाईल. सप्टेंबरच्या सुरुवातीला, रिझर्व्ह बँक आणि वाणिज्य मंत्रालयाने देशातील प्रमुख बँकांच्या उच्च व्यवस्थापनांना आणि व्यापार संस्थांच्या प्रतिनिधींना रुपयातील व्यवहारांना प्रोत्साहन देण्यास सांगितलं होतं.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022)

मुस्लिम धर्मातील सुधारक हमीद दलवाई यांची ९० वी जयंती नुकतीच २९ सप्टेंबरला साजरी करण्यात आली. यानिमित्त मराठीतले वादळी लेखक भाऊ पाध्ये यांनी त्यांच्या या मित्रावर लिहिलेल्या या लेखाचा काही अंश...

हमीदच्या गोष्टी

हमीद निरीश्वरवादी होता. तो ज्या आपत्तीशी झगडला, तशा आपत्तीत निरीश्वरवादी राहणे ऐऱ्यागैऱ्याचे काम नाही. त्यात तो धर्माने मुसलमान. आमच्या वयाच्या लोकांना फालतू सांसारिक आपत्तींना तोंड देता-देता सिद्धिविनायकाला आणि शिर्डीला शरण जाताना मी पाहिले आहे. डॉ. लोहियांच्या मृत्यूनंतर अत्यंत साधेपणाने आणि कसलेही धार्मिक विधी न करता हमीदचे दहन झाले. हमीदच्या सर्व सत्यशोधक चळवळींपेक्षा त्याचे निर्वाणच मला स्पर्शून गेले...

'आज मी फक्त महात्मा गांधींच्या गोष्टी सांगणार आहे.' डॉक्टर लोहिया यांनी एकदा असे सांगूनच महात्मा गांधींवर भाषण दिले होते. मीदेखील आज हमीदच्या गोष्टी सांगणार आहे, त्यापलीकडे त्याचे माझ्याकडे काही राहिले नाही. मी अलिकडे त्याला भेटलो नव्हतो. तो कधीही मान पुढे करून डोकावत, मला शोधत आला नाही आणि त्यामुळे एखाद्या हॉटेलात बसून गप्पाटप्पा झाल्या नाहीत. तो गोष्ट अत्यंत रसाळपणे सांगायचा. अरेबियन नाईट्स ते हमीद दलवाई-सारेच मुसलमान वर्णन करण्यात मोठे रसाळ. ऐकत राहावी. दळवी यांचे दलवाई कसे बनले किंवा कुणा तरी मुसलमानाने आपल्या दुष्मनाला आपल्या मुसलमानी घराच्या भूलभुलैय्यामध्ये दावत देऊन त्याचा काटा कसा काढला वगैरे.

दै. मराठाची नोकरी सोडून तो मुसलमानांना अक्कल शिकवण्याच्या पाठीमागे हात धुऊन लागला होता. त्याचा थांगपत्ता कुठे असेल, ते काय सांगावे? दै. मराठात असताना त्याच्या सहकाऱ्यांना मी विचारायचो, 'हमीद सध्या कुठे आहे?' ते विनोदाने म्हणत, 'तो आता पाटण्याला असेल जे. पी.शी वाद घालत. मग आला की सांगेल, मी जे.पींना एक सवाल टाकला. जे. पी. त्यावर नॉन-प्लस्ड ना!' मला एकदा तो असाच रेल्वेच्या डब्यात एकटा बसलेला आढळला. मी त्याच्याजवळ बसलो. मी त्याला डिवचण्यासाठी म्हणालो, ''काय हे मुस्लिम सत्यशोधक समाजाचे लफडे सुरू केले आहेस?'' तो म्हणाला, ''तुला काही मिळत नाही वाटतं हातात! तू काढ शोधून!''

हां, मी काही दिवस सिनेमा-व्यवसाय शोधून काढला. हां! आमच्या दोघांच्या लेखी काही तरी शोधून काढणे, हा एक आवश्यक भाग होता. कारण एकदा आम्ही एकाच प्रवाहात होतो. समाजवाद्यांच्या, साहित्याच्या आणि बेकारीच्या त्या प्रवाहात आम्ही गटांगळ्या खात नेहमीच एकत्र येत असू. हमीद दलवाई या नावाविषयी मला कुतूहल वाटले ते त्याच्या सत्यकथेमध्ये (पंचवीस वर्षांपूर्वी) छापून आलेल्या 'बेकार माणसाच्या गोष्टी'मुळे. मी कामगार चळवळीमधून बाहेर पडून आता बेकारच होतो. बेकारीचे चटके बसल्यामुळे हमीदची ती कथा मला एकदम भिडली होती.

एक दिवस माझी बायको शोषण्णा युनियनच्या कचेरीवर हमीदला घेऊन आली. हमीद त्यावेळी फारच कोवळा, भाबडा, साधा समाजवादी कार्यकर्ता होता. असा कार्यकर्ता म्हटला म्हणजे, तो शोषण्णाला चिकटायचाच. आमच्या युनियनच्या नीरस मंडळींत लिहिण्याची धडपड करणारा आणि थोडेफार वाचलेला मीच. हमीदचीही सत्यकथेतली गोष्ट मी वाचली होती. त्यामुळे त्याची आणि माझी दोस्ती जमली.

साहित्यक्षेत्रात हमीद हा मला सीनिअर होता. फ्रेंड, गाईड, फिलॉसॉफर म्हणून तो तीनही भूमिका पार पाडू लागला. दोस्तोव्हस्की नामक कुणा रशियन कादंबरीकाराचा ग्रंथोबा तो काखेत घेऊन यायचा. त्यामधील काही मजकूर तो माझ्यासमोर ठेवायचा, 'वाच- असं लिहिता आलं पाहिजे!' त्यामुळे मी दोस्तोव्हस्कीच्या पाठीमागे लागलो. साहित्याच्या क्टिव्हिटीमध्ये त्याला फारच उत्साह. त्या वेळी साहित्याच्या चर्चा अशा चालत- 'बा. सी. मर्ढेकरांनी कवितेला नवे वळण दिले.,' 'गंगाधर गाडगीळांनी मराठी कथा गोष्टीच्या फॉर्ममधून सोडवली'. असल्या चर्चांना हमीद मला फरफटत घेऊन जायचा. त्याने रूपारेल कॉलेजमध्ये एक चर्चा मंडळही स्थापन केलं होतं. शिवाय प्रा. शांता शेळके यांचे दादरचे घर, अभिरुचीकार चित्रे यांचे घर, इकडेही तो मला घेऊन जायचा. कधी तरी या चर्चेमध्ये 'हमीद दलवाईने मराठी साहित्यात मुसलमान जीवन आणले' असे बोलले जावे आणि आपले कान तृप्त व्हावेत, असे त्याला मनापासून कुठे तरी वाटत असावे. त्यावेळी लेखकमंडळी असेच लिहीत. श्री.ना.पेंडसे कोकणावर किंवा व्यंकटेश माडगूळकर माणदेशी माणसांवर. माझ्या पहिल्या दोन्ही कादंबऱ्या कामगार चळवळीवर होत्या. मला हमीद म्हणाला, ''तूदेखील चळवळ हाच विषय घेतला आहेस काय?'' मी त्याला म्हणालो, ''मी कामगार चळवळीला कायमचा रामराम ठोकलाय!''

तो काळ असा होता की, राजकारण आणि साहित्य हातात हात घालून जात नसे. हमीद आणि मी अशी चार- दोनच तरुण माणसे राजकारणातही रमत असू आणि लिहीतही असू. हमीदला माझ्या लिखाणात खूप इंटरेस्ट असे आणि मलाही त्याच्या लिखाणात खूप इंटरेस्ट असे, याचे कारण हेच असावे. हमीद माझ्या कथा घेऊन सत्यकथेत जायचा आणि परत घेऊन यायचा. त्यावर संपादक राम पटवर्धन यांनी लिहिलेला शेरा, त्याच्या टिपिकल खटक्या-खटक्याने हसण्याबरोबरच वाचून दाखवायचा, ''घ्या-तुमचा अनुभव गोळीबंद नाही.''

त्यावेळी विजय तेंडुलकर 'वसुधा' मासिकाचे संपादन करायचे. एक दिवस मला त्यांच्याकडे घेऊन गेला. माझ्या लिखाणाविषयी विजयरावांनी त्यावेळी सहानुभूतीने चौकशी केली. याचे कारण, माझ्या लेखनगुणासाठी हमीद जामीन राहिला होता ना!

लेखक म्हणून आयुष्यात कमाई करण्यासाठी असा आमचा दोघांचा स्ट्रगल चालला होता. एरवी आमची उमेदवारी चालली होती, तरी आमच्या उड्या फार मोठ्या होत्या. आपल्या हातून काहीतरी युगप्रवर्तक लिखाण झाले नाही तर काही खरे नाही, असे आम्हाला मनोमन वाटायचे. दोस्तोव्हस्की तर आमच्या माथ्यावरच बसला होता. नाकेला, उंच, फाटक्या देहाचा, गोरा, दाढी वाढवलेला, तोंडात सतत 'सिमला' सिगारेटचे थोटूक चोखत असलेला हमीद म्हणजे मला दोस्तोव्हस्कीच वाटे. दोस्तोव्हस्की म्हणजे एक तुफान जीवन जगलेला लेखक. त्याचे अनुभव किती मोठे असतील! हमीदने एक दिवस मला एक किस्सा सांगितला. लहानपणी गावातल्या नदीमध्ये भर पुरात त्याने होडके हाकारले नि मग पुराने त्याला असे काही वाहून नेले की, आपण जिवंत राहतो की मरतो याची त्याला भ्रांत पडली. ''अनुभव हा असा असतो-'' मला तो म्हणाला. असे अंतर्बाह्य तुफान जगण्यासाठी आणि जीवघेण्या अनुभवासाठी काहीही करायचे. पण वाटून काय उपयोग? बेकारी हात धुऊन पाठीमागे लागली होती आमच्या. बेकारीने आमच्या जीवनातला बराचसा मौल्यवान वेळ आणि संधीही वाया गेली. एक दिवस मी निराश झालो असता हमीद मला म्हणाला, ''प्यासा सिनेमा बघ- तुझा लेखकाचा इगो त्यामुळे सुखावला जाईल.''

भाऊ पाध्ये

एकदा हमीदने धंदा करायचे ठरवले. त्या वेळी त्याने माझ्याकडे चक्क २५० रुपयांची मागणी केली. त्यावेळी माझा पगारही २५० रुपये नव्हता. मी मोठा हुशार. हमीदला दुखवायचे नाही आणि आपल्या खिशाला चाट नको, म्हणून त्याला विठ्ठल वाळिंबे या आमच्या भाबड्या मित्राच्या गळ्यात बांधले. बिचारा विठ्ठल फसला. पैसे देऊन बसला, पण ते मुदतीच्या आत येण्याची शक्यता दिसेना. तो चिडून हमीदला अद्वातद्वा बोलू लागला. हमीद अगदी खालच्या आवाजात त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करू लागला. मी सेफ होतो. अर्थात, पैसे देण्या-घेण्यामुळे आमचे संबंध बिघडले नाहीत. हमीद आमच्याकडे येत राहिला. हमीदने एकदा बॉक्सेसचा धंदा सुरू केला, नंतर ट्रकचा. दोन्ही धंदे बुडाले. त्याच्या ट्रकच्या धंद्याचा किस्सा विजय तेंडुलकर वर्णन करून सांगत, तो ऐकण्यासारखा आहे. पैशांवरून संबंध तुटतात म्हणतात, पण हमीदचे संबंध कधीच तुटले नाहीत. पैसे घेऊन व देऊनही तो भेटायला येतच असे.

एक दिवस अचानक तो 'आर्किमिडिज'प्रमाणे 'युरेका - युरेका' म्हणतच माझ्याकडे आला. त्याने माझ्या कानावर बातमी घातली ती अशी- खादी बोर्डात एक मेहरुन्निसा नावाची मुलगी आहे. ज्या अर्थी खादी बोर्डात लागली आहे, त्याअर्थी ती किमान मॅट्रिक असणारच- वगैरे. 'पुढे प्रगती?' होईल, म्हणाला. पण आपल्यासाठी खुदाने मुलगी निर्माण केली आहे, हे काय कमी आहे? त्यानंतर एक दिवस तो फोर्टात मिस्त्री भवनमध्ये जिथे खादी बोर्ड होते, त्याच्या टेरेसवर तिच्याशी दोन-तीन तास प्रेमालाप करून आला. त्याने आपण बाजी मारल्याचा किस्सा सांगितला. त्यावेळी मी हा फटकळ आणि बेछूट असामी एका तरुण मुलीशी प्रेमालाप कसा करत असेल, हे चित्र डोळ्यांसमोर उभं करत होतो. काही केल्या ते चित्र डोळ्यांसमोर उभे राहिना. एकूण हमीद लग्न करत होता.

मेहरुन्निसा धीराची. तिने हमीदला वरले होते, म्हणजे वरले होते. लग्नाचा दिवस ठरला. त्यावेळी आपले दुश्मन आपल्या वाटेमध्ये काय काय अडचणी आणतील, या शंकांनी हमीद घेरलेला असे. अखेर मेहरुन्निसा घरातून बाहेर पडली, शादी नीटपणे झाली. हमीद आणि मेहरुन्निसा मुंबईच्या एका उंच शिखरावर अँटॉप हिलवर पोहोचले. ते एक मुसलमान होस्टेल असावे. एक दिवस हमीद मला पाहुणचारासाठी घेऊन गेला. हमीद नेहमीच अशा भलत्याच वैराण ठिकाणी राहायचा. प्रथम जोगेश्वरी स्टेशनपासून ओशिवरा येथे भन्नाट रस्त्यावर एकच एक दलवायांची बंगली होती. तिथे तो राहायचा. आता अँटॉप हिलवर या नवपरिणत युगुलाचा तो संसार पाहण्यासाठी मला अक्षरशः तंगड्या तोडाव्या लागल्या. पण वर गेल्यावर बरं वाटलं. मला मुसलमानांच्या संस्कृतीचे एक आकर्षण नेहमीच वाटले. ते म्हणजे, त्यांच्या देवाच्या घरात भरपूर मोकळी जागा ठेवतात. मला आता ते घर संपूर्ण आठवत नाही, पण खूप मोकळे वाटत होते. माझ्या स्वागतासाठी चहा व भजी होती आणि मी त्यांना कसलेच प्रेझेंट घेऊन गेलो नव्हतो. आपल्या सुखी संसाराविषयी सांगण्याऐवजी त्या दोघांनी दुष्मनाच्या हालचाली इतक्या ऐकवल्या की, त्या रीत्या जागेच्या भिंतींना कान तर नाहीत ना, असे मला भय वाटू लागले.

अखेर हमीदची आणि सग्यासोयऱ्यांची गोडी झाली असावी. हमीद आणि मेहरुन्निसाबाई They lived happily everafter असे जीवन जगू लागली होती. धर्मेच म्हणजे सत्यशोधक समाजाच्या कार्यात व अर्थेच- कारण मेहरुन्निसाही नोकरी करत होती. दोघांनी परस्परांना चांगलीच साथ दिली. हमीदने काढलेला पहिला मुस्लिम स्त्रियांचा मूक मोर्चा आठवतो. एक हमीद आणि पाच मुस्लिम बायका मागे. प्रत्येकाच्या हातात एक एक घोषणा- फलक. एकूण असा मोर्चा काढायला, नव्हे तर, त्यात सहभागी व्हायलाही हिंमत असावी लागते. मेहरुन्निसाबाई त्यांत एक होत्या. मी हमीदची बायको असतो, तर त्या मोर्चात मुळीच गेलो नसतो. 'डोंबाऱ्याचा खेळ' ही माझी पहिली कादंबरी हमीदच्या पहिल्या पुस्तकाच्या आधी आली. एक प्रकारे मी शर्यतीत आघाडीच मिळवली होती. लेखकाचे पहिले पुस्तक त्याच्या वाङ्मयीन जीवनातील घटना असते. माझ्यापेक्षा सीनिअर असलेले हमीद, दिलीप चित्रे यांची पुस्तके रेंगाळली आणि त्यामुळे त्यांच्या लिखाणावर लक्षणीय परिणाम झाला, असे माझे मत आहे. माझी स्प्रिंग मिलमधील नोकरीही याच वेळी संपली. हमीद त्यावेळी मला ना.वि. काकतकर संपादन करत असलेल्या 'रहस्य-रंजन' मासिकाच्या फोर्टमधील कचेरीत घेऊन गेला. तिथे माझी अशोक शहाणेशी गाठ पडली. अशोक शहाणे 'डोंबाऱ्याचा खेळ' वाचत होता. त्याने पुढील अंकातच माझ्यावर फर्मास परीक्षण लिहून मला आघाडीच्या लेखकांत नेऊन बसवले. त्यामुळे माझी हस्तरेषाच बदलून गेली. आतापर्यंत मी एक पाय राजकारणात आणि एक पाय लेखनात, अशी वाटचाल करत होतो; पण मी आता राजकारणातून माझा पाय उचलून फक्त लेखनाच्या दगडावर ठेवायचे ठरवले. माझ्या पुस्तकानंतर लगोलग हमीदचा 'लाट' हा कथासंग्रह अशोकच्या हातात दिसू लागला. 'लाट'वर अशोकने लिहिलेल्या परीक्षणाचे हस्तलिखित मला वाचायला मिळाले. त्याने हमीदचे पुस्तक झोडून काढले. मला त्यामुळे फारच वाईट वाटले. मी अशोकला म्हणालो, ''तुला काय म्हणायचे आहे? हमीद चांगला लिहित नाही का? हमीदचे अनुभव किती समृद्ध आहेत ना!''

''आहेत ना! मला ठाऊक आहे. त्याच्याजवळ अनुभवांचा खूप साठा आहे. पण त्यापैकी लेखनात काहीच उतरत नाही.'' अशोकच्या परीक्षणानंतर हमीदची हस्तरेषाही बदलली असावी. त्या परीक्षणामुळे तो नक्कीच दु:खी झाला असावा, पण त्याला इलाज नव्हता. त्या परीक्षणानंतर हमीद लेखनातून आपला पाय उचलून राजकारणात हळूहळू ठेवतो आहे, असा भास झाला.

हमीदचे त्यानंतरचे पुस्तक 'इंधन'. त्याच्यावर मी 'नवशक्ती'मध्ये चांगले परीक्षण लिहिले असले, तरी मी हमीदकडून अधिक जोरदार लेखनाची अपेक्षा करत होतो. हमीद जी माणसं पाहत असे - ज्या घटना पाहत असे, ती उघडी दिसतील अशा पद्धतीने त्यांचा आपल्या लिखाणात उपयोग करायचा. 'इंधन'मधल्या व्यक्तीमुळे चिपळूणमध्ये निदर्शने झाली, ती त्यामुळेच. हमीदच्या 'इंधन'ला राज्य पारितोषिक मिळाले, त्याच वेळी वासूनाक्याचे वादळही उठले होते. आचार्य अत्रे माझ्यावर जोरात हल्ले करत होते. एक दिवस हमीदचा मला फोन आला. तो म्हणाला, ''मी आणि शिरीष पै, साहेबांची समजूत काढण्याचा प्रयत्न करतो आहोत. तू अस्वस्थ होऊ नकोस.'' वगैरे.

हमीदने 'इंधन'नंतर मराठी साहित्यात काही भर टाकली नाही किंवा मराठी साहित्यात कोकणचा मुसलमान आणला नाही वगैरे- म्हणून काहीच बिघडले नाही- अर्थात, त्याचे; मराठी साहित्याचे नव्हे! मराठी साहित्यात आता प्रादेशिक कादंबऱ्यांची पहाट झोपडपट्टी, वासूनाक्याची दुपार आणि कोसला व बॅ.धोपेश्वरकर यांची संध्याकाळ संपून चक्क भयाण रात्र सुरू झाली होती. या रात्रीमध्ये मलाही चांगली प्रसिद्धी मिळाल्यानंतर फारसा इंटरेस्ट राहिला नव्हता. आता साहित्याच्या माध्यमापेक्षा चित्रपटाच्या माध्यमांतच काही करता आले तर ते बरे, असे मला वाटू लागले होते. मग उगीच या साहित्याच्या अंधारमय जीवनात ठेचकाळण्यापेक्षा हमीद मुसलमानांमध्ये सुधारणेचे कार्य करू लागला. त्यामुळे त्याचे कर्तृत्वही प्रकाशात आले.

त्यानंतर हमीद एका चळवळीचा पूर्ण नेता झाल्याचे दृश्य पाहण्याचा योग आला. मराठा मंदिर येथे भरलेल्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या परिषदेत. मुस्लिम सत्यशोधक ह्या चळवळीने आता विचारात येण्याइतके मोठे स्वरूप धारण केले होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले कार्यकर्ते, अनेक मुसलमान महिला आणि चळवळीच्या अग्रस्थानी हमीद विराजमान झालाय. एक विचारवंत, धडाडीचा मुत्सद्दी आणि आपले सर्वस्व त्या चळवळीमध्ये झोकून देणारा लढवय्या. अचानक त्याचा जीवनपट माझ्या डोळ्यांसमोरून हलला. त्यानंतर माझ्या नि हमीदच्या मुलाखती कमी. हमीदला आमच्यासारखे वेगवेगळ्या विषयांत इंटरेस्ट नाहीत आणि मुस्लिम चळवळीमध्ये त्याने लक्ष घातल्यामुळे तो पछाडल्यासारखाच वागत होता. एकदा मी चक्क त्याच्याबरोबर चर्चगेट ते बांद्रा हा प्रवास केला. या प्रवासामध्ये तो इतका काही आपल्या विचारात गढला होता की, मला तो विसरलाच होता. दुसरी गोष्ट, माझ्या लक्षात आली होती- ती म्हणजे, तो सतत अस्थिर होता. आपले हात, बोटे व भिवया अशा काही हलवायचा की, मलाही बेचैन वाटू लागले. बांद्रा येताच मी त्याचा निरोप न घेताच उतरलो- त्या वेळी माझ्यावरचे एक दडपण दूर झाल्यासारखे वाटले. मुंबई हे एक दुरावा निर्माण करणारे शहर आहे. एखाद्या क्यूमध्ये अधिकाधिक माणसे घुसू लागली म्हणजे आपण जसे दूर फेकले जातो, तसे मुंबईमध्ये आपण एकमेकांपासून दूर फेकले जातो. हमीदला मी अलीकडे भेटत नसे. मी अतिशय आळशी, एकलकोंड्या आणि माणूसघाण्या झालो होतो. मुंबईमध्ये मधुमेह आणि हे स्वभावदोष एकदम येतात. मला आठवते- एकदा मी मेहरुन्निसा भाभीला चलाखीने टाळून सटकण्याचा प्रयत्न करत होतो, पण भाभीने मला पकडून चांगलेच शरमिंदा केले होते. हमीदपासून मी दूर गेलो, याच्याबद्दलही मला अशीच शरमिंदगी वाटते...

परवा हमीद गेल्याचे वृत्त आले. तेव्हा एक मित्र, हमीदचे कुठल्या मशिदीमध्ये दफन होणार याची माहिती काढण्यासाठी फोनवर फोन करत होता. अखेर तो 'झूम'च्या कचेरीमध्ये आला नि मला म्हणाला, ''काही कळत नाही, हमीदला कुठे नेला ते?'' मी म्हणालो, ''त्याला चंदनवाडीत इलेक्ट्रिक भट्टीत नेण्यात आले आहे. जा तिथे.'' तो म्हणाला, ''तू चौकशी केलीस का?'' मी म्हणालो, ''नाही, पण मला ठाऊक आहे.'' हमीद निरीश्वरवादी होता. तो ज्या आपत्तीशी झगडला, तशा आपत्तीत निरीश्वरवादी राहणे ऐऱ्यागैऱ्याचे काम नाही. त्यात तो धर्माने मुसलमान. आमच्या वयाच्या लोकांना फालतू सांसारिक आपत्तींना तोंड देता-देता सिद्धिविनायकाला आणि शिर्डीला शरण जाताना मी पाहिले आहे. डॉ.लोहियांच्या मृत्यूनंतर अत्यंत साधेपणाने आणि कसलेही धार्मिक विधी न करता हमीदचे दहन झाले. हमीदच्या सर्व सत्यशोधक चळवळींपेक्षा त्याचे निर्वाणच मला स्पर्शून गेले.

(सोबत साप्ताहिक - सात जून, १९७७)

(हमीद दलवाई (जन्म - २९ सप्टेंबर, १९३२; मृत्यू - ३ मे, १९७७)

(फेसबुकवरून साभार)

बाबा पदमनजी-आद्य मराठी कांदबरीकार

आपल्या या साहित्यकृती अधिकाधिक वाचकांपर्यंत जाण्यासाठी बाबा प्रकाशनपूर्व सवलीची किंमत, भरपूर जाहिरात वगैरे मार्केटिंग तंत्रांचा कुशलतेने वापर करत. त्यामुळे त्यांच्या हयातीत 'यमुनापर्यटन'च्या तीन आवृत्या हातोहात खपल्या. आपल्या या कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीत ही कादंबरी कुणी खरेदी केली याची बाबांनी सरळसरळ यादीच प्रकाशित केली. या यादीमध्ये दादोबा पांडुरंग, जगन्नाथ शंकरशेठ, लोकहितवादी, महात्मा जोतिबा फुले, शेख दाऊद गुलाम महंमद, शिक्षणतज्ज्ञ रेव्ह. जॉन विल्सन, रेव्ह. नारायण शेषाद्री, मराठी शब्दकोशकार जेम्स टी. मोल्सवर्थ आदी त्याकाळच्या नामांकित व्यक्तींचा समावेश होता.

मराठी भाषेतील आद्य कादंबरीकार म्हणून बाबा पदमनजी सुपरिचित आहेत. तत्कालीन समाजातील विधवांच्या प्रश्नास वाचा फोडण्यासाठी आणि विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार करण्यासाठी १८५७ साली 'यमुनापर्यटन' ही कादंबरी लिहून त्यांनी मराठी भाषेत कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा पाया घातला.

जवळजवळ सव्वाशे पुस्तके लिहून बाबांनी मराठी साहित्यातील कोश, निबंध, आत्मचरित्र वगैरे वाङ्मयप्रकारांची दालने समृद्ध केली.

बाबा पदमनजी त्या काळातील एक प्रमुख समाजसुधारकही होते. आपल्या साहित्यातून त्यांनी प्रचलित विविध घनिष्ट सामाजिक रीतिरिवाजांवर टीका केली. पेशवाईचा अस्त होऊन ब्रिटिश आमदानीच्या काळात महाराष्ट्रातील समाज जीवनास नवी दिशा देणाऱ्या सामाजिक पुढाऱ्यांमध्ये बाबा पदमनजींचा समावेश होतो.

बाबा पदमनजी यांचा जन्म बेळगाव येथे १८३१ च्या मे महिन्यात झाला. त्यांचे संपूर्ण नाव बाबा पदमनजी मुळे. मात्र त्या काळात प्रचलित असलेल्या प्रथेमुळे त्यांनी आपल्या आडनावाचा वापर केला नाही. बाबा पदमनजी हे कासार जातीचे होते. त्यांचे वडील पदमनजी माणिकजी यांनी दक्षिण कोकणात सब असिस्टंट सर्व्हेअर व बिल्डर म्हणून काम केले होते, नंतर त्यांची बेळगावात बदली झाली. बेळगावातच लंडन मिशनच्या शाळेत बाबा पदमनजींनी शिक्षण घेतले. १८४७ साली वर्षभर त्यांचे एडन येथे वास्तव्य होते. तेथून परल्यानंतर १८४९ साली त्यांनी मुंबईतील काळबादेवी गायवाडी येथील फ्री चर्च विद्यालयात प्रवेश घेतला. या विद्यालयात नारायण शेषाद्री हे मूळचे चित्पावन ब्राह्मण समाजातील, पण नंतर ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केलेले शिक्षक शिकवित असत.

या काळातच बाबा पदमनजी यांची हिंदू समाजातील चालीरीतींविषयी, जातिभेदांविषयीची मते बदलत गेली. त्याकाळात अत्यंत गुप्त रीतीने स्थापन झालेल्या परमहंस मंडळीचे ते सभासद बनले. मात्र त्याकाळात समाजसुधारणांबाबत कर्मठ मंडळींचा कडवा विरोध लक्षात घेऊन परमहंस मंडळीच्या स्थापनेबाबत कमालीची गुप्तता बाळगण्यात येत असे. मात्र या मंडळीच्या एका सभासदाने या सभेच्या सदस्यांची यादीच प्रसिद्ध केली. परमहंस मंडळीच्या सभासदांच्या या यादीने त्याकाळात समाजात मोठी खळबळ निर्माण केली होती. या सभेच्या सदस्यांचा ख्रिस्ती धर्माकडे कल आहे, हे सर्व सभासद लवकरच ख्रिस्ती होणार अशीही वदंता सगळीकडे पसरली.

बाबा पदमनजींच्या वडिलांनी त्यामुळे बाबांना ताबडतोब घरी म्हणजे साताऱ्याजवळील उडतरे गावी बोलावून घेतले. बाबा पदमनजींनी ३ सप्टेंबर १८५४ रोजी म्हणजे वयाच्या तेविसाव्या वर्षी बेळगाव येथे बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. आपण धर्मांतर का केले याची कारणे बाबांनी 'ज्ञानोदय' या ख्रिस्ती नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या लेखात दिली होती. या धर्मांतराचे वृत्त तत्कालीन अनेक मराठी नियतकालिकांतही प्रसिद्ध झाले. सोळा वर्षे बाबांचे पुण्यात वास्तव्य होते. पुण्यात ते बराच काळ फ्री चर्चच्या शाळेत शिक्षक म्हणून काम करत.

बाबा पदमनजींचे महात्मा जोतिबा फुले यांच्याशी चांगले संबंध होते. बाबा पदमनजी हे अनेकदा बी.पी. किंवा बा.प. या आपल्या नावाच्या आद्याक्षरांनी लेख लिहित असत. महात्मा फुल्यांच्या 'ब्राम्हणाचे कसब' या पुस्तकाला बाबांनी प्रस्तावना लिहिली होती व प्रस्तावनेखाली बी.पी. अशी सही केली होती. त्याशिवाय महात्मा फुले यांच्या 'शिवाजीचा पोवाडा' या पुस्तकाची प्रूफेही बाबांनी तपासली होती. बाबा पदमनजी त्याकाळात ख्रिस्ती समाजात खूप लोकप्रिय होते असे दिसून येते.

कामिल पारखे

त्यांच्या धर्मांतरास ४० आणि ५० वर्षे पूर्ण झाली, त्यावेळी हा प्रसंग साजरा करण्यासाठी खास समारंभ झाले होते व या समारंभाचे वृत्तान्तही प्रसिद्ध झाले होते.

त्यांनी स्वत:ही काही नियतकालिकांचे अनेक वर्षे प्रकाशन केले. 'उदयप्रभा', 'सत्यदीपिका (धाकटी)', 'सत्यदीपिका (थोरली)', सत्यवादी, कुटुंबमित्र आणि ऐक्यदर्शक पत्रिका ही बाबांनी चालविलेली नियतकालिके.

समाजाचे उपेक्षित घटक असणाऱ्या बालविधवा आणि महिलांच्या उन्नतीसाठी महात्मा फुल्यांनी कार्य सुरू केले तेव्हा त्यांना प्रचंड सामाजिक प्रक्षोभास तोंड द्यावे लागले. अशावेळी बाबांनी आपल्या या स्नेह्यास पाठबळ पुरविले. 'सत्यदीपिका' नियतकालिक चालविणारे बाबा पदमनजी यांच्यासारखे ख्रिस्ती मिशनरी आणि 'ज्ञानोदय' सारख्या मिशनरींच्या मुखपत्राने जोतिरावांना नेहमी साहाय्य केले आणि त्यांची कड घेतली, असे ज्येष्ठ संशोधक य. दि. फडके यांनी आपल्या 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र (खंड पहिला) या ग्रंथात नमूद केले आहे.

मराठी साहित्यातील कादंबरी, शब्दकोश, निबंधसंग्रह, चरित्रे, आत्मचरित्र, मृत्युलेख वगैरे विविध वाङ्मयप्रकारांत मोलाची भर टाकणाऱ्या बाबा पदमनजींना आपल्या या साहित्यकृतींच्या अनेक आवृत्त्या प्रसिद्ध होण्याचे भाग्य लाभले. अर्थात यासाठी त्यांची जाहिरातपद्धती आणि ही पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या प्रभावी पद्धती उपयुक्त ठरल्या.

आपल्या या साहित्यकृती अधिकाधिक वाचकांपर्यंत जाण्यासाठी बाबा प्रकाशनपूर्व सवलीची किंमत, भरपूर जाहिरात वगैरे मार्केटिंग तंत्रांचा कुशलतेने वापर करत. त्यामुळे त्यांच्या हयातीत 'यमुनापर्यटन'च्या तीन आवृत्या हातोहात खपल्या. आपल्या या कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीत ही कादंबरी कुणी खरेदी केली याची बाबांनी सरळसरळ यादीच प्रकाशित केली. या यादीमध्ये दादोबा पांडुरंग, जगन्नाथ शंकरशेठ, लोकहितवादी, महात्मा जोतिबा फुले, शेख दाऊद गुलाम महंमद, शिक्षणतज्ज्ञ रेव्ह. जॉन विल्सन, रेव्ह. नारायण शेषाद्री, मराठी शब्दकोशकार जेम्स टी. मोल्सवर्थ आदी त्याकाळच्या नामांकित व्यक्तींचा समावेश होता. या सामाजिक पुढाऱ्याचे वयाच्या ७५ व्या वर्षी म्हणजे २९ ऑगस्ट १९०६ रोजी मुंबईत निधन झाले. मुंबईतील शिवडी येथे त्यांचा पार्थिव देह पुरण्यात आला. एखाद्या वाङ्मयप्रकारातील पहिली



वहिली कृतीच मोठी प्रक्षोभक, वादग्रस्त आणि तत्कालीन समाजातील एखाद्या महत्त्वाच्या ज्वलंत प्रश्नाचा वेध घेणारी क्वचितच असते, 'यमुनापर्यटन' ही पहिली वहिली कृती त्यादृष्टीने अपवादात्मकच म्हणाली लागेल, असे बाबा पदमनजींचे चरित्रकार डॉ. केशव सीताराम कऱ्हाडकर यांनी म्हटले आहे.

एकोणिसाव्या शतकात विधवांची स्थिती आणि त्यांचा पुनर्विवाह हा अत्यंत ज्वलंत सामाजिक विषय होता. विधवांच्या प्रश्नावर लिहिलेल्या या कादंबरीस बाबांचे एक स्नेही आणि समाजसुधारक दादोबा पांडुरंग यांनी छापील २७ पानांची संस्कृतमध्ये प्रस्तावना लिहिली. या प्रस्तावनेचा १८ पानांचा मराठीतील सारांशही बाबांनी आपल्या या कादंबरीबरोबर प्रसिद्ध केला.

विधवांच्या पुनर्विवाहाची गरज दादोबा पांडुरंगांनी आपल्या या प्रस्तावनेत मांडली. त्यामुळे 'यमुनापर्यटन' या कादंबरीद्वारे समाजात विधवा विवाहाबाबत जागृती करण्याचा कादंबरीकाराचा हेतू होता हे स्पष्ट होते. बाबांनी आपल्या या कादंबरीचे उपशीर्षक 'हिंदुस्थानातील विधवांच्या स्थितीचे निरूपण' असे ठेवले त्यावरूनही हेच स्पष्ट होते.

बाबा पदमनजींनी 'शब्दरत्नावली' या नावाचा समानार्थी शब्दांचा कोश अथवा थिसॉरस १८६० साली प्रसिद्ध केला. मराठी भाषेतील हा पहिलाच समशब्दकोश. इंग्रजी भाषेतील ज्येष्ठ कोशकार पीटर मार्क रॉजेट थिसॉरस या प्रसिद्ध समानार्थी शब्दांच्या कोशाच्या धर्तीवर 'शब्दरत्नावली'ची निर्मिती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे रॉजेट थिसॉरसची पहिली आवृत्ती १८५२ साली प्रसिद्ध झाली. त्यानंतर केवळ आठ वर्षांतच रेव्ह. पदमनजींनी आपला 'शब्दरत्नावली' कोश प्रसिद्ध केला. मराठी भाषेतील आद्य कादंबरीकार बाबा पदमनजी मराठी भाषेतील एक प्रमुख कोशकर्ते म्हणूनही ओळखले जातात. संस्कृतमध्ये 'निघंटु' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शब्दकोश या वाङ्मयप्रकाराचा मराठीत सर्वप्रथम पाया रेव्ह. विल्यम केरी या बॅप्टिस्ट मिशनरीने १८१० साली रचला. बाबा पदमनजी यांनी १८६० साली इंग्लीश आणि मराठी कोशाचा संक्षेप (Comprehensive Dictionary-English and Marathi) या नावाचा त्यांचा पहिला शब्दकोश प्रसिद्ध केला. बावीस हजारांहून अधिक शब्द असलेल्या या कोशाची दुसरी आवृत्ती १८७० साली तर तिसरी आवृत्ती १८८९ साली प्रसिद्ध झाली. पुण्याच्या भवानी पेठेत बोहरा दफन भूमीजवळ त्यांच्या नावाने चौक आहे.

(संदर्भ : 'बाबा पदमनजी' : काल व कर्तृत्व'-डॉ. केशव सीताराम कऱ्हाडकर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई ४०० ०३२ (१९७९). ('ख्रिस्ती मिशनरींचे योगदान', लेखक कामिल (पारखे (वितरक सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती २०१७) मधील एक प्रकरण)

तळा तालुक्याला नागरी समस्यांनी ग्रासले

। तळा । वार्ताहर ।

कालानुरूप परिस्थितीनुसार तळा ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर झाले. बघता बघता नगरपंचायतीला पाच वर्षांचा कालावधी उलटून गेला. मात्र शहर सुजलाम सुफलाम झाले असे काहीही घडलेले नाही. ग्रामपंचायत असताना शहरातील बहुतांश समस्या अद्यापही कायम आहेत. त्यामुळे समस्यांनी ग्रासलेल्या शहराचा विकास होणार तरी कधी असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.



शहरातील मुख्य असलेल्या पाण्याच्या प्रश्नाच राजकीय पक्षांनी खेळ मांडला आहे. आधी मंजुरी पत्र मग बॅनर बाजी त्यानंतर श्रेयवाद व पुन्हा वर्क ऑर्डर निघाली नाही म्हणून एकमेकांवर खापर फोडण्याचे काम चालू आहे. तळेवासीयांनी असे घाणेरडे राजकारण याआधी कधीही पाहिले नसेल. शहरातील डम्पिंग ग्राऊंडची समस्या अद्यापही जैसे थे च आहे. दरवर्षी लाखो रुपयांचा निधी खर्च करून शहराची स्वच्छता करण्यात येते. मात्र गोळा केलेला कचरा हा तहसिल कार्यालयाजवळ असलेल्या धरणाजवळ टाकला जातो. केवल नावालाच स्पीकरवरून ओला व सुका कचरा वेगळा देण्यास सांगितला जातो. प्रत्यक्षात मात्र कचरा विघटनाची कोणतीही व्यवस्था नसल्याने एकत्रितरीत्या हा कचरा साठविला जात आहे. उन्हाळी हा कचरा जाळला जातो तर पावसाळी डम्पिंग ग्राउंडची अवस्था दयनीय झालेली पहायला मिळते. या परिसरात कायम दुर्गंधी पसरलेली असते व जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना या दुर्गंधीचा सामना करावा लागतो. याच ठिकाणी अर्ध्या शहराला पाण्याचा पुरवठा करणारी बोरिंग असल्याने कालांतराने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यांसह उनाड गुरे, भटकी कुत्रे, मच्छिमार्केटचा प्रश्न, सुसज्ज भाजी मंडई, यांसारख्या अनेक समस्या एवढ्या वर्षानंतरही कायम आहेत. या समस्या सुटण्यासाठी शहराला कोणीतरी दत्तक घेण्याची नितांत आवश्यकता आहे.

महत्त्वाचे

कामगार संघटनेची स्थापना

। उरण । वार्ताहर ।

उरणमधील कामगारांना न्याय मिळावा, कामगार क्षेत्रातील विविध अन्यायाला वाचा फोडावी. कामगारांवरील अन्याय दूर करता यावेत यासाठी कामगारांच्या हितासाठी समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. यावेळी अतुल भगत, रुपेश पाटील, अनिल भोईर, दिपेश वास्कर, विकास घरत, नैनेश म्हात्रे, अंकित पाटील, राज वास्कर, आशीर्वाद पाटिल आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

मोटार सायकलची पनवेलमध्ये चोरी

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल शहरातील रुपाली टॉकीज जवळून सिद्धांत मार्केट बिल्डिंग समोरून ६० हजार रुपये किमतीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. हृतिक सोनकर यांची ६० हजार रुपये किमतीची पांढऱ्या भगव्या रंगाची एम एच ११ सी झेड ०४५५ ही तेथे विश्वासाने दिली असता सुमारे ३० वर्षीय वयाच्या एका इसमाने सदर मोटार सायकलचा अपहार केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

जनजागृतीसाठी विद्यार्थी उतरले रस्त्यावर

। माणगाव । वार्ताहर ।

समाजातील वाढती व्यसनाधीनता आणि त्यामुळे होणारे दुष्परिणाम याकडे लक्ष केंद्रित करण्याकरिता लोणेरे येथील एस एस निकम हायस्कूलच्या इयत्ता आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांनी नुक्कड नाटक सादर केले. हे नाटक बाजारपेठेत ठिकठिकाणी सादर होत असून त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

समाजात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या व्यसनाधीनतेमुळे सामाजिक तसेच कौटुंबिक स्वास्थ्य धोक्यात येत चालले आहे. वाढती गुन्हेगारी आणि कर्करोगामुळे होणारी जीवितहानी टाळायची असेल तर समाज व्यसनमुक्त होणे गरजेचे आहे हा संदेश देण्यासाठी विद्यार्थ्यांनी चक्क रस्त्यावर उतरत पथनाट्य करून जनजागृती केली. गोरेगाव बस स्थानकात या विद्यार्थ्यांनी तंबाखू, गुटखा खाल्ल्याने दारू प्यायल्याने त्याचे कसे विपरीत परिणाम होतात त्यातून कसा अंत होऊन कुटुंबाची वाताहत होते याचे सादरीकरण केले.

यावेळी दर्शना चावरेकर, प्रियदर्शनी पाटील यांच्या संकल्पनेतून तयार झालेल्या या नुक्कड नाटकात मधुरा गडकरी, सर्वेश गोरेगावकर, वेद शिंदे, नेहा गोरेगावकर, गौरी मेटरकर, ईश्वरी घोसाळकर, वैभव मोहिते, अर्षदा मुरूडकर, कुशल पाटील, ओम गावनर या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

एक्स्प्रेसवेवर टेम्पोला भीषण आग

जीवितहानी टळली

। खोपोली । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर अंडा पॉईंटजवळ शुक्रवारी रात्री मेडसिनल केमिकल मालवाहू टेम्पोला भीषण आग लागली. काही वेळ अंग्नीतांडव परिस्थितीमुळे वाहतुककोंडी झाली होती. अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी पोहचल्यामुळे मोठा अनर्थ टळला. या आगीमुळे एक्सप्रेसवरील वाहतुक बोरघाटातून वळवली. सुदैवाने त्यातील कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र काही कोंबड्या मृत पावल्याने नुकसान झाले आहे.

आगीच्या ज्वाळा आजूबाजूला पसरत होत्या. त्यामुळे बोरघाट वाहतूक पोलीस यंत्रणेचे पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे यांनी दोन्ही बाजूची वाहतूक थांबवली. आग विजविण्यासाठी खोपोली नगरपालिकेचे अग्निशमन दल व पेण नगरपालिकेने मदत केली. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य घटनास्थळावर सर्व यंत्रणांना सहकार्य केले. जवळपास दोन तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली. आयआरबी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, होमगार्ड इत्यादी परिस्थिती पूर्ववत करण्याचे काम केले.

कमान अधिकारीपदी प्रशांत गोजरे

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

भारतीय तटरक्षक दल मुरूड जंजिराच्या कमान आधिकारी म्हणून कमांडंट प्रशांत गोजरे यांनी कमांडंट अरूण सिंहयांचेकडून सूत्रे हाती घेतली.

गोजरे हे मूळचे नाशिकचे रहिवाशी असून ते जुलै १९९४ पासून भारतीय तटरक्षक दलाच्या सेवेत आहेत. याआधी त्यांनी भारतीय तटरक्षक दलात २५ वर्षे वैमानिक म्हणून काम केले आहे. मुबई, कोची, पोर्टब्लेअर, कलकत्ता, गांधीनगर, चेन्नई येथे त्यांनी सक्रिय अधिकारी, कमान अधिकारी, विभागीय वैमानिक अधिकारी इत्यादि उच्चपदांवर काम केले आहे. आतापर्यंतच्या त्यांच्या या वाटचालीतील महत्वपूर्ण कामगिरी म्हणजे त्यांनी आतापर्यंत ४००० तासांपेक्षा जास्त उड्डान केले आहे. देशसेवेचे हे कार्य

यशस्वीरित्या भूषवित असताना त्यांना कारगील युद्धादरम्यान कारगिल विजय पदक अंदमान सेवा पदक २५, ५० व ७५ वर्षे भारतीय स्वातंत्र्यपदक विशेष सेवा पदक देऊन गौरविण्यात आले आहे. याशिवाय महानिर्देशक, तटरक्षक प्रशंसा पदक आणि क्षेत्रिय महानिरिक्षक प्रशंसा पदकाने देखील ते गौरविले गेले आहेत. जिल्हयाच्या तटाच्या संरक्षणासोबत सागरी पर्यावरणाचे रक्षण, प्रदूषण नियंत्रण, समुद्रातील मच्छिमार, खलाशांचे संरक्षण आणि त्यांना मदत करण्यासाठी माझी संपूर्ण टिम सदैव तत्पर असेल असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाप्रसंगी तटरक्षक दलातील आधिकारी वर्ग व अनेक मान्यवर उपस्थित होते.

समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांचा शुकशुकाट

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

अरबी समुद्रातील वादळी पाऊस गेल्या आठवड्यापासून थांबला असून, पर्यटनासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे मुरूड तालुक्यातील समुद्र किनाऱ्यावरील पर्यटन स्पॉटवर पर्यटकांची मोठी वर्दळ सूरु होईल असा अंदाज व्यावसायिकांना होता; परंतू तो फोल ठरला आहे. तालुक्यातील सर्वच समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांचा शुकशुकाट दिसत आहे. पर्यटकांनी पाठ फिरवल्याने मुरूड, नांदगाव, काशीद, बारशिव, आगरदांडा, खोरा जेट्टी, राजपूरी जेट्टी

॥ स्थानिकांचा रोजगारावर परिणाम

॥ धंदा बुडाल्याने व्यावसायिक हवालदिल

वर पर्यटक नसल्याने व्यावसायिकांना नुकसानीचा धक्का बसला आहे. गजबजलेल्या समुद्रकिनारी मोजकीच वाहने आणि पर्यटक दिसून येत आहे. निव्वळ पर्यटन व्यवसायावर अवलंबित व्यावसायिक हवालदिल झाले आहेत.

सोशल मीडियावर भारतात ५ जी लाँचचा ट्रेंड

वर्षा मेहता

। अलिबाग ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दिल्लीतील दूरसंचार कार्यक्रमात भारतात ५ जी सेवा सुरू केली. भारताच्या डिजिटल लँडस्केपमध्ये संभाव्य बदल करून पुढील काही वर्षांमध्ये ही सेवा उत्तरोत्तर संपूर्ण देश व्यापेल अशी अपेक्षा आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन केल्यानंतर, पीएम मोदी ५ जी काय करू शकतात याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी विविध दूरसंचार ऑपरेटर आणि तंत्रज्ञान पुरवठादारांनी उभारलेल्या मंडपांमध्ये फिरले. त्यांनी रिलायन्स जिओच्या स्टॉल्सपासून सुरुवात केली, जिथे त्यांनी 'True 5G' उपकरणे प्रदर्शित केली आणि गळे Glass द्वारे वापर प्रकरणाचा अनुभव घेतला.

दूरसंचार मंत्री अश्विनी वैष्णव आणि रिलायन्सचे अब्जाधीश मुकेश अंबानी, भारती एअरटेलचे सुनील भारती मित्तल आणि व्होडाफोन आयडियाचे कुमार मंगलम बिर्ला यांच्या समवेत, त्यांनी एंड-टू-एंड ५G तंत्रज्ञानाचा स्वदेशी विकास समजून घेण्यासाठी वेळ घालवला. त्यानंतर त्यांनी एरटेल, वोडाफोन आईडिया, आणि इतरांच्या स्टॉल्सना भेट दिली. नुकत्याच झालेल्या दूरसंचार स्पेक्ट्रमच्या भारतातील सर्वात मोठ्या लिलावाला विक्रमी १.५ लाख कोटी बोली मिळाल्या होत्या, ज्यामध्ये मुकेश अंबानीच्या जिओने ८८,०७८ कोटींच्या बोलीने विकल्या गेलेल्या सर्व एअरवेव्हसपैकी जवळपास निम्म्या जागा मिळवल्या होत्या.

SOCIAL MEDIA पडसाद